NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001
YEAR : 35) 1st November 2010 ( No : 09

# माझे आर्थिक जीवन २०१०

**प्रा.बी.टी.देशमुख,** *विधानपरिषद सदस्य*

*****

*सन २००४ मध्ये असलेल्या स्थावर मालमत्तांच्या संख्येमध्ये कोणताही बदल झालेला नसल्यामुळे त्यावेळच्या परिशिष्ट १ मध्ये दिलेले स्थावर मालमत्तांचे २००४ चे विवरण हेच सन २०१० च्या स्थावर मालमत्तांचे विवरणपत्र होय.*

(परिच्छेद ६४ व परिशिष्ट १ पहा)

* * * * *

*अनुशेष निर्मूलनाच्या प्रयत्नात जाणिवा व जागृती निर्माणाचे जे काम आमची संघटना करीत आहे ते लक्षात घेता सन २००४ नंतरचे विधानमंडळ सदस्य या नात्याने मिळणारे सर्व वर्षांचे वेतन (Salary) संघटनेच्या सुपूर्त करण्याचा निर्णय घेतला व त्याची अम्मलबजावणी केली.*

(परिच्छेद ८९ व सहपत्र १,२,३ पहा)

* * * * *

*विधानमंडळ सदस्य या नात्याने सन १९८० पासून तर २००५ पर्यंतच्या २५ वर्षाच्या काळात एक रुपयाची सुद्धा वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती कोषागारातून घेतलेली नाही.*

(परिच्छेद ९१ व सहपत्र ४ पहा)

* * * * *

*गेल्या ५-६ वर्षातील आयकर विवरण पत्राचा भाग असलेल्या करपात्र व करमुक्त उत्पन्नात जंगम मालमत्तांच्या स्वामित्त्वाचे स्रोत समाविष्ट आहेत.*

(परिच्छेद ९२ पहा)

* * * * *

*''विधिमय, विधिमान्य व पारदर्शक अशी ''उमेदवाराची उपजीविकेची साधने, त्याच्याजवळ असलेल्या स्थावर व जंगम मालमत्ता व या मालमत्ता संपादनाचे स्रोत'' ही त्याच्या आर्थिक जीवनाची महत्वाची अंगे आहेत. या आर्थिक जीवनाची संपूर्ण माहिती घेण्याचा लोकांचा अधिकार आता २००३ पासून कायद्याने मान्य केलेला आहे.*

(परिच्छेद ६१ पहा)

* * * * *

# माझे आर्थिक जीवन २०१०

**प्रा.बी.टी.देशमुख,** *विधानपरिषद सदस्य*

### मुळ निवेदन व पुढील निवेदन

६०. सन २००४ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून एक प्रतिनिधी निवडण्यासाठी जी निवडणूक झाली त्यामध्ये मी उमेदवार होतो. त्यावेळी **"माझे आर्थिक जीवन"** या मथळ्याचे ५९ परिच्छेदांचे व ९ परिशिष्टे समाविष्ट असलेले एक तपशिलवार निवेदन (यापुढे उल्लेख 'मुळ निवेदन' असा) मी नुटा बुलेटीनमध्ये प्रकाशित केले होते. (सन २००४ च्या नुटाबुलेटीनचे पृष्ठ ११७ ते १३६) आज २०१० मध्ये उमेदवार म्हणून या निवडणूकीत सहभागी होतांना "माझे आर्थिक जीवन-२०१०" (पुढील निवेदन) या मथळ्याखाली या मुळ निवेदनाच्या पुढील सहा वर्षातील (सन २०१० पर्यंतचा) तपशील सादर करीत आहे. मुळ निवेदनात एकूण ५९ परिच्छेद होते. त्यामुळे पुढील निवेदनाची सुरुवात या परिच्छेद ६० पासून केलेली आहेत. मुळ निवेदनात एकूण ९ परिशिष्टे होती, त्यामुळे पुढील या निवेदनातील परिशिष्टांना ९ च्या पुढचे क्रमांक दिलेले आहेत. मुळ निवेदनातील सर्व परिच्छेद व परिशिष्ट्यें यांचे क्रमांक कायम ठेवून त्यांचा अनेक ठिकाणी पुढील निवेदनात आधार घेतला आहे, त्यातील मजकुराचा वापर केला आहे.

### उमेदवाराचे आर्थिक जीवन

६१. मुळ निवेदनाच्या परिच्छेद १३ मधील पुढील मजकूर मी जसाच्या तसा नमुद करु इच्छितो. :-

**"विधिमय, विधिमान्य व पारदर्शक अशी "उमेदवाराची उपजीविकेची साधने, त्याच्याजवळ असलेल्या स्थावर व जंगम मालमत्ता व या मालमत्ता संपादनाचे स्रोत" ही त्याच्या आर्थिक जीवनाची महत्वाची अंगे आहेत. या आर्थिक जीवनाची संपूर्ण माहिती घेण्याचा लोकांचा अधिकार आता २००३ पासून कायद्याने मान्य केलेला आहे."** त्या भावनेतूनच मुळ निवेदनामध्ये याबाबतचे सारे तपशील मी तपशीलवारपणे व बिनचुकपणे सन २००४ मध्ये मांडले होते.

### किमान सुविधा देणाऱ्या स्थावर मालमत्तांची गरज

६२. मुळ निवेदनाच्या परिच्छेद ५२ मधील पुढील मजकूर मी जसाच्या तसा नमुद करु इच्छितो. :-

**"जीवनावश्यक अशा किमान सोईसुविधा उपलब्ध करुन देणारी स्थावर मालमत्तांची मालकी जीवन जगण्याचा एक आत्मविश्वास मनुष्याला प्रदान करीत असते व त्याचा त्याच्या कामावर निश्चितपणे परिणाम होत असतो. दर दोन चार महिन्यांनी किरायाने असलेले घर खाली करण्याच्या येणाऱ्या सूचना व गावाबाहेर जंगलात आपले एकटे घर असले तरी ते आपले आहे व ते खाली करण्याची लेखी किंवा तोंडी सूचना अजिबात येण्याची शक्यता नाही, या दोनही प्रकारातून मनात येणाऱ्या परस्परविरोधी भावभावनांचा मी नजिकचा लाभधारक असल्यामुळे तद्‌जन्य आत्मविश्वास किंवा त्याचा अभाव कसा असतो याच्याशी मी जवळून परिचित आहे."** असा विचार किमान भौतिक सुविधांविषयी मी त्यावेळी मांडला होता.

### १९८६ नंतर घेतलेले धोरणात्मक निर्णय

६३. मुळ निवेदनाच्या परिच्छेद ४६ मधील पुढील मजकूर मी जसाच्या तसा नमुद करु इच्छितो. :-

"सन १९८० मध्ये मी जो सभागृहात निवडून गेलो तो "शिक्षक- कर्मचारी-पदवीधर" यांचा प्रतिनिधी म्हणून. सहा वर्षाच्या या पहिल्या कार्यकालाच्या उत्तरार्धात "अमरावती पाणी पुरवठा योजना" व "अप्पर वर्धा धरणाचे बांधकाम" या प्रश्नाबाबत सभागृहामध्ये मोठ्या उठावाची सुरुवात करावी लागली. त्याच काळात दांडेकर समितीचा अहवाल प्रसिद्ध झाल्याने आमचे डोळे खाडकन उघडले. १९८० ते १९८६ च्या पहिल्या कार्यकाळात बियाणे प्रकल्प चालूच होता. चांगला जोरात होता. सन १९८३-८४ या वर्षात महत्तम म्हणजे ६३६ बॅग्ज बियाणे उत्पादन झाले होते. उत्तम भाव मिळत होते. पण मनामध्ये असमाधान होते. आपला किती वेळ या कामामध्ये जात आहे? या नुसत्या विचाराने सुद्धा अपराधीपणाची भावना मनात येत होती. माणसाला जनाची नसली तरी मनाची टोचणी असतेच. लोकप्रतिनिधीचा दिवस सुद्धा २४ तासाचाच असतो आणि त्याचा ताससुद्धा ६० मिनिटाचाच असतो. लोकप्रतिनिधीने स्वतःच्या खाजगी प्रकल्पाकडे जास्त वेळ देतो म्हटले की त्याचा प्रतिनिधी म्हणून करावयाच्या कामासाठीचा तेवढा वेळ कमी होतो. १९८६ मध्ये आपण पुन्हा निवडून गेलो तर १९८०-८४ चा अनुशेष भरून काढायचाच असा मनोमन निर्धार केला होता. १९९२ व १९९८ या तर पुढच्या निवडणूका आहेत. सन १९८६ मध्ये मी दुसऱ्यांदा सभागृहामध्ये ज्या वैभवी पाठबळावर पुन्हा निवडून गेलो त्या पाठबळाने काही ठाम निर्णय घेण्याचे बळ मला दिले. १९८६ च्या दुसऱ्या निवडणूकीनंतर मी काही धोरणात्मक निर्णय घेतले ते पुढील प्रमाणे :-

(१) सभागृहाच्या व संघटनांच्या कामामध्ये संपूर्ण वेळ द्यायचा.

(२) सभागृहाच्या कामामध्ये प्रश्नांची मांडणी करण्यासाठी सहाय्यभूत ठरणाऱ्या संघटना व अशा प्रश्नांची मांडणी करण्यात रस घेणाऱ्या सर्वच संघटनांच्या कामासाठी प्राथम्याने वेळ द्यायचा.

(३) मानवी विकासामध्ये सर्वात महत्वपूर्ण असलेल्या शिक्षणाच्या संधीची उपासना करणाऱ्या क्षेत्राचे आपण प्रतिनिधी आहोत याचे सतत स्मरण ठेवणे हे आपले काम आहे.

(४) सर्वच आघाड्यांवर व सर्वच क्षेत्रात सर्वात जास्त अनुशेष असलेल्या

**सन २००४ मध्ये असलेल्या स्थावर मालमत्तांच्या संख्येमध्ये कोणताही बदल झालेला नसल्यामुळे त्यावेळच्या परिशिष्ट १ मध्ये दिलेले स्थावर मालमत्तांचे २००४ चे विवरण हेच सन २०१० च्या स्थावर मालमत्तांचे विवरणपत्र होय.**

(परिच्छेद ६४ व परिशिष्ट १ पहा)

**अनुशेष निर्मूलनाच्या प्रयत्नात जाणिवा व जागृती निर्माणाचे जे काम आमची संघटना करीत आहे ते लक्षात घेता सन २००४ नंतरचे विधानमंडळ सदस्य या नात्याने मिळणारे सर्व वर्षांचे वेतन (Salary) संघटनेच्या सुपूर्त करण्याचा निर्णय घेतला व त्याची अम्मलबजावणी केली.**

(परिच्छेद ८९ व सहपत्र १,२,३ पहा)

विभागाचे आपण प्रतिनिधी आहोत, याचे कधीही विस्मरण होऊ देता कामा नये.

(५) व्यवसायातून मी पूर्णवेळ सुटी काढलेलीच होती. १९८६ नंतर भरपूर पैसा देणारा पण खूप वेळ घेणारा बियाणे प्रकल्प सुद्धा थांबविण्याचा निर्णय घेतला. परिणामी पूर्ण सात आठ एकरावर वार्षिक पीक न घेता १०-१२ वर्षे पुरणारी निलगिरीची लागवड करण्याचा निर्णय घेतला व तो अमलात आणला.

(६) नविन कोणतीही स्थावर मालमत्ता घेण्याचा आता यापुढे विचार सुद्धा करु नये असा निर्णय घेतला व १९८६ मध्ये घेतलेला हा निर्णय पुढची १८ वर्षे काटेकोरपणे पाळला.

अध्ययन, मनन, चिंतन, अभ्यासाधारित विश्लेषण, उपाययोजनांचे निदान व निदानोत्तर निष्कर्षाची अम्मलबजावणी, या साधनांच्या वापरासह कोणत्या कामी वेळ द्यावा व कोणत्या कामी तो देऊ नये याविषयी स्पष्टपणे धोरणात्मक मार्गदर्शन करणारे हे निर्णय होते. ते मी आपल्यापुरते घेतले व काटेकोरपणे पाळले."

### स्थावर मालमत्तांची २०१० ची स्थिती

६४. सन २००४ च्या मुळ निवेदनातील मजकूर वर जसाच्या तसा दिला आहे. त्यामधील उपपरिच्छेद ६ "नविन कोणतीही स्थावर मालमत्ता घेण्याचा आता यापुढे विचार सुद्धा करु नये असा निर्णय घेतला व १९८६ मध्ये घेतलेला हा निर्णय पुढची १८ वर्षे काटेकोरपणे पाळला." असा आहे. आज २०१० मध्ये मी थोडा बदल करुन "नविन कोणतीही स्थावर मालमत्ता घेण्याचा आता यापुढे विचार सुद्धा करु नये असा निर्णय घेतला व १९८६ मध्ये घेतलेला हा निर्णय पुढची २४ वर्षे काटेकोरपणे पाळला." असे ठाम विधान करीत आहे. एका वाक्यात सांगायचे तर **सन २००४ मध्ये असलेल्या स्थावर मालमत्तांच्या संख्येमध्ये कोणताही बदल झालेला नसल्यामुळे त्यावेळच्या परिशिष्ट १ मध्ये दिलेले स्थावर मालमत्तांचे २००४ चे विवरण हेच सन २०१० च्या स्थावर मालमत्तांचे विवरणपत्र होय.**

### स्थावर मालमत्तांची संख्या व मुळ खरेदी किम्मतीचे तपशील

६५. मुळ निवेदनाच्या परिच्छेद ४७ मधील पुढील मजकूर मी जसाच्या तसा नमुद करु इच्छितो. :-

"**सन १९६४ ते आजपावेतोच्या काळात संपादित केलेल्या स्थावर मालमत्तांची एकूण संख्या १० असून त्यांची मूळ खरेदी किंमत रुपये चार लक्ष सहासष्ट हजार दोनशे तीस (रु. ४,६६,२३०) आहे. त्यांचे तपशीलवार विवरण परिशिष्ट १ व २ मध्ये दिलेले आहे. परिशिष्ट १** मध्ये सुरुवातीला अनुक्रम नंबर व मालमत्ता संपादनाची (खरेदीची) तारीख दिली आहे. त्यानंतर खरेदीकर्त्याचे नाव, मालमत्तेचा तपशील,एकूण क्षेत्रफळ, खरेदीची किम्मत व नोंदणी दस्तऐवजाचे अधिकृत तपशील नमुद केलेले आहेत. प्रत्येक स्थावर मालमत्तेची खरेदीची मूळ किम्मत व विद्यमान मूल्य नमूद असलेले विवरणपत्र **परिशिष्ट २** मध्ये दिलेले आहे. त्या परिशिष्टाच्या स्तंभ दोनमध्ये खरेदीची किंवा बांधकामाची तारीख दिली असून स्तंभ ३ मध्ये खरेदीची मूळ किम्मत नमूद केलेली आहे." स्तंभ चार मध्ये सन २००४ चे विद्यमान मुल्य नमुद केलेले आहे. सन २०१० ची स्थिती सादर करित असतांना आता नवे परिशिष्ट १० सोबत जोडले आहे.

### स्थावर मालमत्तांच्या विद्यमान मूल्यांच्या निर्धारणाचे मापदंड

६६. मुळ निवेदनाच्या परिच्छेद ४९ मधील पुढील मजकूर मी जसाच्या तसा नमुद करु इच्छितो. :-

"निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये जो नमुना ठरवून दिला आहे, त्या नमुन्यामध्ये प्रत्येक स्थावर मालमत्तेच्या बाबतीत त्या मालमत्तेचा ठावठिकाणा (Location) व मोजमाप नमूद केले पाहिजे. त्याचबरोबर त्या मालमत्तेचे विद्यमान मूल्य नमूद केले पाहिजे असेही म्हटले आहे. विद्यमान मूल्य कसे काढावे? याबाबतचे कोणतेही मापदंड आयोगाने विहित केलेले नाहीत. मूळ खरेदी किम्मत आणि विद्यमान मूल्य यातील फरक हा "रुपयाचे घसरलेले मूल्य व त्यापोटी मालमत्तांच्या किमतींच्या महागाईवृद्धीदराचा वाढता निर्देशांक" यांचे प्रतिनिधित्व करीत असतो. त्यामध्ये मालमत्ताधारकाच्या कर्तृत्वाचा भाग किती असतो? ही गोष्ट प्रत्येकालाच ठाऊक आहे. अशा स्थितीत मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन बडेजाव मिरविण्यासाठी किम्मती खूप फुगवून नमूद करणे व 'वैभव' लपविण्याच्या हेतूने मालमत्तांच्या संकोच केलेल्या किंमती दाखविणे, हे दोनही मार्ग उमेदवारांना खुले राहतात. विद्यमान मूल्य शास्त्रीय आधारावर काढण्यासाठी काही अधिकृत मापदंड उपलब्ध नाहीत काय? याची बरीच चौकशी या क्षेत्रातील तज्ज्ञांकडे केली असता "मालमत्तांच्या किंमतीच्या महागाईवृद्धीदराचा निर्देशांक" नमूद असलेले अधिकृत नोटीफीकेशन दरवर्षी जुन-जुलै मध्ये किंवा त्यानंतर भारत सरकारतर्फे प्रकाशित करण्यात येते अशी माहिती मिळाली. याबाबतचे लेटेस्ट नोटीफीकेशन २९ जुन २००४ रोजी निघालेले आहे. (Government of India Notification No. 742 (E) dated 29.6.2004 (268 ITR (st) 207) मूळ मालमत्ता ही कोणत्या वर्षी संपादित करण्यात आली? ती काय किंमतीला संपादित करण्यात आली? त्यात काही सुधारणा करण्यात आल्या काय? आल्या असल्यास कोणत्या वर्षी? व त्यासाठी किती खर्च करण्यात आला? इत्यादी गोष्टी लक्षात घेऊन मालमत्तांच्या किमतीच्या महागाईवृद्धीदराच्या निर्देशांकाप्रमाणे वाढीव किम्मत किती धरावी याचे काटेकोर मापदंड या परिपत्रकान्वये ठरवून दिले असून मालमत्तांचे विद्यमान मूल्य त्या आधारे निश्चित केलेले आहे. Current market value is calculated on the basis of "Cost Inflation Index" provided by the latest Government of India Notification No. 742 (E) dated 29.6.2004 (268 ITR (st) 207) "

आता याबाबतचे केंद्र शासनाचे अद्यावत (लेटेस्ट) नोटीफीकेशन २१ जुलै २०१० रोजी निघालेले आहे. (Government of India Notification

**विधानमंडळ सदस्य या नात्याने सन १९८० पासून तर २००५ पर्यंतच्या २५ वर्षाच्या काळात एक रुपयाची सुद्धा वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती कोषागारातून घेतलेली नाही.**

(परिच्छेद ९१ व सहपत्र ४ पहा)

No. S.O.(E) 59/2010 (F No.142/11/2010- TPLI) dated 21.07.2010 असा त्यांचा क्रमांक व दिनांक आहे.

**संपादित केलेल्या एकूण १ ते १० क्रमांकाच्या मालमत्तांचे खरेदी मुल्य व सन २०१० चे विद्यमान मुल्य**

६७. **परिशिष्ट १, २ व १०** चे काळजीपूर्वक अवलोकन केले तर असे दिसून येईल की या १ ते १० क्रमांकाच्या एकूण १० स्थावर मालमत्तांचे विवरण परिशिष्ट एक मध्ये दिलेले असून त्यांची एकूण मूळ खरेदी किम्मत रुपये ४,६६,२३० असून ती परिशिष्ट २ व १० च्या स्तंभ ३ मध्ये दिलेली आहे. सन २००४ चे विद्यमान मुल्य परिशिष्ट २ व १० च्या स्तंभ ४ मध्ये दाखविलेले असून ते रुपये ३४,६६,७९२.०० इतके आहे. तर सन २०१० चे विद्यमान मुल्य परिशिष्ट १० च्या स्तंभ ५ मध्ये दाखविलेले असून ते रुपये ५१,३४,३४३.०० इतके आहे.

**सन २००४ चे व सन २०१० चे नोटीफिकेशन**

६८. परिशिष्ट २ व १० मध्ये नमुद असलेले सन २००४ चे विद्यमान मुल्य केंद्र शासनाच्या वित्त विभागाने काढलेल्या २९ जून २००४ च्या नोटीफिकेशनच्या आधारे निश्चित केलेले होते. Current market value as at 2004 level, is calculated on the basis of "Cost Inflation Index" provided by the Government of India Notification No. 742 (E) dated 29.6.2004 (268 ITR (st) 207) त्याचप्रमाणे सन २०१० चे विद्यमान मुल्य केंद्र शासनाच्या वित्त विभागाने काढलेल्या २१ जुलै २०१० च्या नोटीफिकेशनच्या आधारे निश्चित केलेले आहे. Current market value as at 2010 level is calculated on the basis of "Cost Inflation Index" provided by the latest Government of India Notification No. S.O.(E) 59/2010 (F No.142/11/2010- TPLI) dated 21.07.2010. सन २००४ मध्ये केंद्र शासनाच्या २९.६.२००४ परिपत्रकाप्रमाणे विद्यमान मुल्य दाखविले होते. ते परिशिष्ट २ व १० मध्ये नमुद केले आहे. आज २०१० मध्ये २१.७.२०१० च्या केंद्र शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे ते दाखविले आहे. ते परिशिष्ट १० मध्ये दाखविले आहे. काहींच्या मते प्रत्यक्ष बाजारभावाप्रमाणे या किम्मती दाखविणे जास्त योग्य होय. त्यामुळे मी त्या दोनही पद्धतीने दाखविले आहे. परिशिष्ट १ चे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास असे दिसून येईल की क्रमांक १ ते ८ च्या मालमत्ता ह्या

*(परिशिष्ट : १)*

# स्थावर मालमत्तांचे विवरणपत्र

*सुरुवातीला अनुक्रम नंबर व मालमत्ता संपादनाची (खरेदीची) तारीख दिली आहे. त्यानंतर खरेदीकर्त्याचे नाव, मालमत्तेचा तपशील, एकूण क्षेत्रफळ, खरेदीची किम्मत व नोंदणी दस्तऐवजाचे अधिकृत तपशील नमूद केलेले आहेत.*

### (अ) विधानपरिषद सदस्य होण्यापूर्वी संपादित केलेल्या स्थावर मालमत्ता

(१) तारीख ७.१.१९७०, **खरेदीदाराचे नाव** : भाऊराव तुळशिरामजी देशमुख, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ४१/२, प्लॉट नंबर तीन (३), **एकूण क्षेत्रफळ** : ३०१० चौरस फुट, **खरेदीची किम्मत** : रुपये तीन हजार (रु. ३०००) **नोंदणी** : दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक ७२ वर सन १९७० च्या जानेवारी महिन्याच्या ७ तारखेस नोंदला.

(२) तारीख ७.१.१९७०, **खरेदीदाराचे नाव** : सौ. सुशीला भाऊराव देशमुख, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ४१/२, प्लॉट नंबर दोन (२), **एकूण क्षेत्रफळ** : ३०१० चौरस फुट, **खरेदीची किम्मत** : रुपये तीन हजार (रु. ३०००) **नोंदणी** : दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक ७३ वर सन १९७० च्या जानेवारी महिन्याच्या ७ तारखेस नोंदला.

(३) तारीख ७.१.१९७०, **खरेदीदाराचे नाव** : (आज भूमीभागधारक : सौ. सुशीला भाऊराव देशमुख,) मूळ खरेदी भूमीभागधारकांच्या वडिलांनी केलेली व त्यांचे नावे, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ४१/२, प्लॉट नंबर चार (४), **एकूण क्षेत्रफळ** : ३०१० चौरस फुट, **खरेदीची किम्मत** : रुपये तीन हजार (रु. ३०००) **नोंदणी** : दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक ७८ वर सन १९७० च्या जानेवारी महिन्याच्या ७ तारखेस नोंदला.

(४) तारीख ७.१.१९७०, **खरेदीदाराचे नाव** : (आज भूमीभागधारक : सौ. सुशीला भाऊराव देशमुख,) मुळ खरेदी भूमीभागधारकांच्या बंधूंनी केलेली व बंधुंच्या नावे, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ४१/२, प्लॉट नंबर पाच (५), **एकूण क्षेत्रफळ** : ३०१० चौरस फुट, **खरेदीची किम्मत** : रुपये तीन हजार (रु. ३०००) **नोंदणी** : दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक ७१ वर सन १९७० च्या जानेवारी महिन्याच्या ७ तारखेस नोंदला.

(५) तारीख १.२.१९७२, **खरेदीदाराचे नाव** : भाऊराव तुळशिरामजी देशमुख, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ४१/२, प्लॉट नंबर एक (१), **एकूण क्षेत्रफळ** : ५००० चौरस फुट, **खरेदीची किम्मत** : रुपये आठ हजार (रु. ८०००) **नोंदणी** : दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक २५२ वर सन १९७२ च्या फेब्रुवारी महिन्याच्या १ तारखेस नोंदला.

(६) तारीख १७.५.१९७४, **खरेदीदाराचे नाव** : सौ. सुशीला भाऊराव देशमुख, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ११, **एकूण क्षेत्रफळ** : ४ एकर ३० गुंठे **खरेदीची किम्मत** : रुपये विस हजार (रु. २००००) **नोंदणी** : दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक १४५६ वर सन १९७४ च्या मे महिन्याच्या १७ तारखेस नोंदला.

(७) तारीख २३.४.१९७९, **खरेदीदाराचे नाव** : सौ. सुशीला भाऊराव देशमुख, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ११, **एकूण क्षेत्रफळ** : दोन एकर एकोणवीस गुंठे, **खरेदीची किम्मत** : रुपये चौदा हजार नऊशे अठ्ठ्यांशी (रु. १४९८८) **नोंदणी** : दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक १३५७ वर सन १९७९ च्या एप्रिल महिन्याच्या २३ तारखेस नोंदला.

(८) बांधकामाचा काळ १९७२ ते ७४, **मालकाचे नाव** : भाऊराव तुळशिरामजी देशमुख, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ४१/२, प्लॉट नंबर तीन बांधलेले रहाते घर (३), **बांधकामाची किम्मत** : रुपये एकतीस हजार (रु. ३१०००)

### (ब) विधानपरिषद सदस्य झाल्यानंतर संपादित केलेल्या स्थावर मालमत्ता

(९) तारीख २७.५.१९८५, **खरेदीदाराचे नाव** : भाऊराव तुळशिरामजी देशमुख, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर १२१/३ व ४, त्यातील प्लॉट नंबर एक (१), **एकूण क्षेत्रफळ** : ३३३१ चौरस फुट, **खरेदीची किम्मत** : रुपये नऊ हजार नऊशे नव्वद (रु. ९९९०) **नोंदणी** : दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक ३८३५ वर सन १९८५ च्या मे महिन्याच्या २७ तारखेस नोंदला.

(१०) बांधकामाचा काळ १९८३ ते १९९०, **मालकाचे नाव** : भाऊराव तुळशिरामजी देशमुख, **मालमत्तेचा तपशील** : वरळीसागर को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी मर्यादीत या विधानमंडळ सदस्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये वैतरणा, या इमारतीमध्ये सदनिका क्रमांक १००३, ९५० चौरस फुट, **बांधकामाची किम्मत** : रुपये तीन लक्ष सत्तर हजार दोनशे बावन्न (रु. ३,७०,२५२) २५ ऑगस्ट १९८३ पासून तर प्रत्यक्ष सदनिका सुपुर्त होण्याच्या तारखेपर्यंतच्या (१५ ऑक्टोबर १९९०) ७-८ वर्षाच्या काळात २,७०,२५२ रुपयाचा भरणा गृहनिर्माण संस्थेमध्ये करावा लागला. त्याशिवाय १ लक्ष रुपयाचे कर्ज महाराष्ट्र हाऊसिंग फायनान्स या वित्तिय संस्थेकडून गृहनिर्माण संस्थेच्या माध्यमातून तसा अर्ज करणाऱ्या प्रत्येक सदस्याला उपलब्ध करुन देण्यात आले. अशा रितीने संपादनाचा एकूण खर्च रुपये ३,७०,२५२ एवढा आला.

*सन २००४ च्या मुळ निवेदनातील हे परिशिष्ट १ जसेच्या तसे वर दिले आहे.*

१९७९ पूर्वी संपादित केलेल्या आहेत. क्रमांक ९ व १० च्या मालमत्ता ह्या सन १९८० ते ८५ या काळात संपादन केलेल्या आहेत. मालमत्ता त्याच असल्या तरी रुपयाच्या घसरलेल्या किमतीमुळे बाजारभाव सतत वाढत जातात हे सर्वांनाच ठाऊक आहे. अर्थात बाजारभाव हे अंदाजे व ढोबळमानाने माहिती घेवून लावलेले आहेत. त्याप्रमाणे लावलेले विद्यमान मुल्य **सहपत्र पाच** मध्ये दाखविले आहे.

**सन १९९९ पर्यंतच्या आर्थिक जीवनाचा संक्षिप्त आढावा**

६९. सन २००४ च्या मुळ निवेदनाच्या परिच्छेद ५२ मधील पुढील मजकूर मी जसाच्या तसा नमुद करु इच्छितो. :-

"स्थावर मालमत्तांमध्ये करण्यात आलेल्या गुंतवणूकीचे परिशिष्ट एकमध्ये नमुद केलेले तपशील पाहिल्यास या १० मालमत्तांवरील एकूण गुंतवणूक रुपये ४,६६,२३० एवढी आहे. मग हे १९९८ पर्यंतचे एवढे मोठे करपात्र व बरोबरीने करमुक्त उत्पन्न गेले कोठे? याचा ज्यावेळी मी या निमित्ताने आता आढावा घेतला तेव्हा माझ्या असे लक्षात आले की पायाभूत सोईसुविधांच्या गराड्यांमध्ये ज्यांनी जन्म घेतलेला असतो त्यांना आपल्या जीवनभराच्या कर्तृत्वाने जन्मतः उपलब्ध झालेल्या पायाभूत सोईसुविधांच्या इमारतीला नुसती रंगसफेदी व अशा इमारतीच्या कळसाला चकाकी आणण्याचाच तेवढा खर्च करावा लागतो. अशा सोईसुविधांच्या अभावामध्ये ज्यांना आपल्या जीवनाची सुरुवात करावी लागते त्यांना किमान मुलभूत सोईसुविधांची इमारत बांधतांना अशा इमारतीच्या पायामध्ये दगड विटांच्या भरावासाठी काढलेल्या कर्जाच्या मुद्दल व व्याजाचे हप्ते फेडण्यातच त्यांच्या जीवनाचा अर्ध्यापेक्षा जास्त प्रवास खर्ची पडलेला पहावा लागतो.

जीवनावश्यक अशा किमान सोईसुविधा उपलब्ध करुन देणारी स्थावर मालमत्तांची मालकी जीवन जगण्याचा एक आत्मविश्वास मनुष्याला प्रदान करीत असते व त्याचा त्याच्या कामावर निश्चितपणे परिणाम होत असतो. दर दोन चार महिन्यांनी किरायाने असलेले घर खाली करण्याच्या येणाऱ्या सूचना व गावाबाहेर जंगलात आपले एकटे घर असले तरी ते आपले आहे व ते खाली करण्याची लेखी किंवा तोंडी सूचना अजिबात येण्याची शक्यता नाही, या दोनही प्रकारातून मनात येणाऱ्या परस्परविरोधी भावभावनांचा मी नजिकचा लाभधारक असल्यामुळे तद्जन्य आत्मविश्वास किंवा त्याचा अभाव कसा असतो याच्याशी मी जवळून परिचित आहे. प्रत्येक पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी घेतलेल्या कर्जापोटी मुद्दल व व्याजाचे हप्ते फेडणे हा एक खर्चाचा मोठा भाग होता.

***(परिशिष्ट : २)***

***संपादित स्थावर मालमत्तांची मूळ किम्मत व विद्यमान मूल्य नमूद असलेले विवरणपत्र***

| Sr. No. | Construction / Purchase Date | Price | Current Market value |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | 07.01.1970 | 3,000 | 20,400 |
| 2. | 07.01.1970 | 3,000 | 20,400 |
| 3. | 07.01.1970 | 3,000 | 20,400 |
| 4. | 07.01.1970 | 3,000 | 20,400 |
| 5. | 01.02.1972 | 8,000 | 51,200 |
| 6. | 17.05.1974 | 20,000 | 1,20,000 |
| 7. | 23.04.1979 | 14,988 | 77,938 |
| 8. | 1972 -1974 | 31,000 | 7,00,000 |
| 9. | 27.05.1985 | 9,990 | 36,054 |
| 10. | 1983 -1990 | 3,70,252 | 24,00,000 |
| | **TOTAL** | **4,66,230** | **34,66,792** |

**Notes**

(१) परिशिष्ट एक व दोन मध्ये अनुक्रमांक सारखेच असून प्रत्येक क्रमांकाच्या मालमत्तेची तपशीलवार माहिती परिशिष्ट १ मध्ये दिलेली आहे.

(२) १ते १० क्रमांकाच्या एकूण १० स्थावर मालमत्तांची स्तंभ २ मध्ये दाखविलेली मूळ खरेदी किम्मत किंवा बांधकामाची किम्मत याबाबत लेखाचा परिच्छेद ४२ व ४७ तसेच विद्यमान मूल्य करीता परिच्छेद ४८ व ४९ पहा.

(3) Current market value is calculated on the basis of "Cost Inflation Index" provided by the latest Government of India Notification No. 742 (E) dated 29.6.2004 (268 ITR (st) 207)

*सन २००४ च्या मुळ निवेदनातील हे परिशिष्ट २ जसेच्या तसे वर दिले आहे.*

**१९६४ ते १९७० या काळात मला कोणत्याही कर्जफेडीला तोंड द्यावे लागले नाही. १९७० ते ऑगस्ट १९९९ पर्यंतच्या काळात विविध प्रकारच्या कर्जाचे मुद्दल व व्याजाचे हप्ते हा बराच मोठा खर्चाचा भाग होता. ऑगस्ट १९९९ नंतर मात्र त्यातून पूर्णपणे मुक्तता झाली असे म्हणता येईल."** सन २००४ च्या मुळ निवेदनातील या परिच्छेदाच्या शेवटच्या चार ओळीमध्ये हा १९९९ पर्यंतच्या आर्थिक जीवनाचा संक्षिप्त आढावा पूर्णपणे आला आहे असे मला वाटते.

**सन १९९९ नंतर झालेले बदल**

७०. सन २००४ च्या मुळ निवेदनाच्या परिच्छेद ५४ मधील पुढील मजकूर मी जसाच्या तसा नमुद करु इच्छितो. :-

**"शिक्षक या नात्याने निवृत्ती वेतनाचा विकल्प :** मी "शिक्षक या नात्याने निवृत्ती वेतनाचा विकल्प" दिलेला असल्याने त्या नात्याने नियत वयोमानानुसार (ऑगस्ट १९९९ नंतर) मिळालेल्या सेवानिवृत्ती लाभांचे तपशील **परिशिष्ट ४** मध्ये दिलेले आहेत."

सन १९९९ नंतर झालेले महत्त्वाचे बदल (१) कर्ज फेडीतून पूर्णपणे मुक्तता (२) सेवानिवृत्ती वेतनामुळे शेतीच्या उत्पन्नावर येणाऱ्या दैनंदिन खर्चाचा भार थांबला (३) परिशिष्ट चारमध्ये नमुद केलेल्या सेवानिवृत्ती लाभाच्या गुंतवणीवरील निश्चित परतावा १९९९ नंतर मिळू लागला.

**सन २००४ नंतर झालेला बदल**

७१. सन २००४ मध्ये "आर्थिक जीवन" नमुद असलेले जे नुटा बुलेटीन आमच्या संघटनेतर्फे प्रकाशित झाले त्याचे सर्वत्र मोठे स्वागत झाले. एखादा लोकप्रतिनिधी एवढे बारिक सारिक तपशिल प्रामाणिकपणे व पारदर्शकपणे लोकांच्या समोर मांडतो याबाबत लोकांनी समाधान व्यक्त केले. वृत्तपत्रांनीसुद्धा त्या उपक्रमाचे स्वागत केले.

**दोन मोठ्या मालमत्तांच्या उत्पादकतेबाबतचे प्रश्नचिन्ह**

७२. केवळ त्या नुटा बुलेटीनच्या प्रकाशनामुळे माझ्या वैयक्तीक जीवनात एक मोठा फायदा झाला. तो असा की माझ्या ह्या सर्व आर्थिक स्थितीबाबत मला माझ्या अनेक मित्रांनी अनेक चांगल्या सूचना केल्या. कदाचित ते बुलेटीन

***(परिशिष्ट : १०)***

***संपादित स्थावर मालमत्तांची मूळ किम्मत व सन २०१० चे विद्यमान मूल्य नमूद असलेले विवरणपत्र***

| Sr. No. | Construction / Purchase Date | Price | Market value as in 2004 | Current Market value as in 2010 |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | 07.01.1970 | 3,000 | 20,400 | 30,218 |
| 2. | 07.01.1970 | 3,000 | 20,400 | 30,218 |
| 3. | 07.01.1970 | 3,000 | 20,400 | 30,218 |
| 4. | 07.01.1970 | 3,000 | 20,400 | 30,218 |
| 5. | 01.02.1972 | 8,000 | 51,200 | 75,828 |
| 6. | 17.05.1974 | 20,000 | 1,20,000 | 1,77,720 |
| 7. | 23.04.1979 | 14,988 | 77,938 | 1,15,427 |
| 8. | 1972 -1974 | 31,000 | 7,00,000 | 10,36,700 |
| 9. | 27.05.1985 | 9,990 | 36,054 | 53,396 |
| 10. | 1983 -1990 | 3,70,252 | 24,00,000 | 35,54,400 |
| **Total** | | **4,66,230** | **34,66,792** | **51,34,343** |

**Notes**

(१) परिशिष्ट एक, दोन व दहा मध्ये अनुक्रमांक सारखेच असून प्रत्येक क्रमांकाच्या मालमत्तेची तपशीलवार माहिती परिशिष्ट १ मध्ये दिलेली आहे.

(2) Current market value as in 2004 was calculated on the basis of "Cost Inflation Index" provided by the Government of India Notification No. 742 (E) dated 29.6.2004 (268 ITR (st) 207)

(3) Current market value as in 2010 is calculated on the basis of "Cost Inflation Index" provided by the latest Government of India Notification No. S.O.(E) 59/2010 (F No.142/11/2010-TPLI) dated 21.07.2010.

प्रकाशित झाले नसते तर काही वर्षे ती स्थिती तशीच चालु राहीली असती. मोठ्या भावाप्रमाणे माझ्यावर प्रेम करणाऱ्या माझ्या एका ज्येष्ठ सहकाऱ्यांने त्या बुलेटीनच्या वाचनानंतर माझ्यावरील स्नेहापोटी मला खडसून चार चौघासमक्ष असे सुनावले की, "लोकप्रतिनिधीनी अवैध मार्गाने काही मिळवू नये इथपर्यंत बरोबर आहे. पण विधिमयरित्या आपल्या मालकीच्या असलेल्या मालमत्तांची उत्पादकता नकारार्थी स्तरावर किंवा निम्न स्तरावर ठेवणे यात कोणताही सुज्ञपणा नाही. त्या मालमत्तेची उत्पादकता कायम ठेवली तर आपल्या वैयक्तीक जीवनातील आर्थिक तणाव कमी होण्यात जशी मदत होते तसेच सार्वजनिक कामासाठी सुद्धा आपण काही मदत करु शकतो. तुमच्या विवरण पत्रातील दोन मोठ्या मालमत्ता या कमी उत्पादक किंवा अनुत्पादक अवस्थेत पडलेल्या आहेत हे सुज्ञपणाचे नाही." आज हयात नसलेले हे माझे ज्येष्ठ सहकारी अर्थशास्त्राचे निष्णात शिक्षक होते.

### मोठी अशी पहिली अनुत्पादक मालमत्ता

**७३.** ज्या दोन मालमत्तांची वर चर्चा केली आहे त्या मालमत्तांचे तपशील मी नमुद करु इच्छितो. सन २००४ च्या मुळ निवेदनात (परिशिष्ट १ मध्ये क्रमांक १० वर) पहिल्या मालमत्तेचा तपशील नमुद करण्यात आलेला आहे. तो शब्दशः पुढील प्रमाणे :-

"बांधकामाचा काळ १९८३ ते १९९०, **मालकाचे नाव** : भाऊराव तुळशिरामजी देशमुख, **मालमत्तेचा तपशील** : बरळीसागर को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी मर्यादित या विधानमंडळ सदस्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये वैतरणा, या इमारतीमध्ये सदनिका क्रमांक १००३, ९५० चौरस फुट, **बांधकामाची किम्मत** : रुपये तीन लक्ष सत्तर हजार दोनशे बावन्न (रु. ३,७०,२५२) २५ ऑगस्ट १९८३ पासून तर प्रत्यक्ष सदनिका सुपुर्त होण्याच्या तारखेपर्यंतच्या (१५ ऑक्टोबर १९९०) ७-८ वर्षाच्या काळात २,७०,२५२ रुपयाचा भरणा गृहनिर्माण संस्थेमध्ये करावा लागला. त्याशिवाय १ लक्ष रुपयाचे कर्ज महाराष्ट्र हाऊसिंग फायनान्स या वित्तिय संस्थेकडून गृहनिर्माण संस्थेच्या माध्यमातून तसा अर्ज करणाऱ्या प्रत्येक सदस्याला उपलब्ध करुन देण्यात आले. अशा रितीने संपादनाचा एकूण खर्च रुपये ३,७०,२५२ एवढा आला." **विधानमंडळ सदस्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये वैतरणा, या इमारतीमध्ये सदनिका क्रमांक १००३, थोडक्यात 'सदनिका' असा यापुढे उल्लेख**

### दुसरी मोठी अशी कमी उत्पादक मालमत्ता

**७४.** दिसायला मोठी पण कमी उत्पादक मालमत्ता असलेल्या दुसऱ्या मालमत्तेचे तपशील २००४ च्या त्याच निवेदनांत परिशिष्ट १ मध्ये क्रमांक ६ व ७ वर नमुद आहेत ते पुढील प्रमाणे :-

"(६) तारीख १७.५.१९७४, **खरेदीदाराचे नाव** : सौ. सुशीला भाऊराव देशमुख, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ११, **एकूण क्षेत्रफळ** : ४ एकर ३० गुंठे **खरेदीची किम्मत** : रुपये विस हजार (रु. २००००) **नोंदणी** : दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक १४५६ वर सन १९७४ च्या मे महिन्याच्या १७ तारखेस नोंदला.

(७) तारीख २३.४.१९७९, **खरेदीदाराचे नाव** : सौ. सुशीला भाऊराव देशमुख, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ११, **एकूण क्षेत्रफळ** : दोन एकर एकोणवीस गुंठे, **खरेदीची किम्मत** : रुपये चौदा हजार नऊशे अठ्ठ्यांशी (रु. १४९८८) **नोंदणी** : दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक १३५७ वर सन १९७९ च्या एप्रिल महिन्याच्या २३ तारखेस नोंदला."

### महत्त्वपूर्ण जागी ७-८ एकर शेतजमीन

**७५.** सन १९७४ मध्ये ४ एकर ३० गुंठे व सन १९७९ मध्ये २ एकर १९ गुंठे शेतजमिन संपादित केल्यामुळे (परिशिष्ट १ मालमत्ता क्रमांक ६ व ७) उत्पन्नाचे एक अतिरिक्त विधिमय माध्यम उपलब्ध झाले. विहीरीच्या पाण्यावर उत्तम सिंचन सुविधा उपलब्ध असलेली ही ७-८ एकरची शेती आहे. शिवाय असे की अगदी सुरुवातीच्या ८-१० वर्षाच्या काळात व ऑगस्ट १९९९ नंतरच्या आजपर्यंतच्या काळात आमची उपजिविका किंवा प्रपंच या शेतीवर अवलंबून नव्हता. ऑगस्ट १९९९ पूर्वीच्या १०-१२ वर्षात या शेतीचा उपजिविकेला व प्रपंचाला सुद्धा हातभार लागला ही वस्तुस्थिती आहे. मुख्य राज्य रस्ते महामार्गावर असलेली ७-८ एकराची ही शेतजमीन महानगरपालिकेच्या प्रक्षेत्रामध्ये असून चारही बाजूंनी निरनिराळ्या इमारतीची बांधकामे त्या विभागात झाल्यामुळे या जमिनीची उत्पादकता वाढविण्याच्या ज्या विविध योजना मला सुचविण्यात आल्या होत्या त्या, अशा कामासाठी लागणाऱ्या वेळेच्या अभावी, मला अमलात आणता आल्या नाहीत. **मात्र १९९९ नंतरच्या काळात प्रपंचाचा कोणताही भार या शेतीवर नव्हता हे एक व दुसरे म्हणजे सिंचन सुविधा असलेली शेतजमीन म्हणून वर्षातून दोन पिके उत्तम रितीने घेता आल्याने त्यातून येणारे उत्पन्न यातून समाधानकारक उत्पादकता प्राप्त होत राहीली.**

*(परिशिष्ट : ४)*

## STATEMENT

### of particulars regarding the amount received by Prof. B.T.Deshmukh on account of, Original Retirement Gratuity & Commutation of Pension, Revised Retirement Gratuity & Commutation of Pension, Final payment of G.P.F. and P.P.F. account

| Sr. No. | Date of Payment | Particulars | Amount |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | 23.06.1998 : | P.P.F.Amount | 1,35,857.00 |
| 2. | 24.09.1999 : | Retirement Gratuity | 1,58,425.00 |
| 3. | 02.10.1999 : | Commutation of Pension | 1,07,361.00 |
| 4. | 29.10.1999 : | Final Payment of G.P.F. | 97,863.00 |
| 5. | 06.01.2001 : | Revised Gratuity | 91,575.00 |
| 6. | 17.11.2000 : | Revised Commutation | 2,17,076.00 |
| 7. | | Total | 8,08,157.00 |

**Notes :** (1) The amount mentioned at Sr.No.1 above is due to Closure (after extention) of the PPF Account On Maturity of Account No. P.P.F./ 7 ( opend on 25th May 1978 ) under Public Provident Scheme 1968. Closed on 23rd June 1998. Total Amount Received on maturity is Rs. 1,35,857.

(2) The amount of Gratuity mentioned at Sr.No.2 above was sanctioned as a Retirement Gratuity Payment by Accountant General Maharashtra II Nagpur vide his order No. PR Cell/PRIV/RIV/OC 249/99-2000 Dated 2.8.1999.

(3) The amount of Commutation of Pension mentioned at Sr.No.3 above was sanctioned as a Payment of Commutation of Pension by Accountant General Maharashtra II Nagpur vide his order No. PR Cell/PRIV/RIV/OC 249/99-2000/2297 Dated 2.8.1999.

(4) The amount mentioned at Sr.No.4 above is the Final Payment of G.P.F. amount after closure due to retirement by Principal S.S. College, Amravati vide Cheque No. 156735 dated 25.10.1999

(5) The amount mentioned at Sr.No.5 above was sanctioned as revised Retirement Gratuity Payment by Accountant General Maharashtra 2 Nagpur vide his order No. PR IV/RIV/OC 249/99-2000 Dated 27.07.2000.

(6) The amount mentioned at Sr.No.6 above was passed as a revised Payment of Commutation of Pension by Accountant General Maharashtra 2 Nagpur vide his order No. PR Cell/PRIV/RIV/OC 299/99-2000/2298040 Dated 09.10.2000.

******

*सन २००४ च्या मुळ निवेदनातील हे परिशिष्ट ४ जसेच्या तसे वर दिले आहे.*

### श्रीमती देशमुखांच्या जंगम मालमत्तांचे निधी स्रोत

७६. सन २००४ च्या मुळ निवेदनाच्या परिशिष्ट ८ मध्ये श्रीमती देशमुखांच्या खाती असलेल्या त्यावेळच्या गुंतवणूकी म्हणजे (१) त्या परिशिष्टाच्या परिच्छेद ३ मधील **बँकेतील मुदती ठेव,** मुळ गुंतवणूक त्यावरील परताव्यासह (२) त्या परिशिष्टाच्या परिच्छेद ४ मधील **पोस्टाची मासिक प्राप्ती योजना,** मुळ गुंतवणूकीवरील (त्या योजनेवरील बोनस व) परताव्यासह (३) त्या परिशिष्टाच्या परिच्छेद ५ (अ) **मधील सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी १९६८** (Public Provident Fund Scheme 1968) : ३१ मार्च १९८६ ला सुरु केलेले सौ.सुशीला भाऊराव देशमुख यांचे पहिले पीपीएफ खाते क्रमांक 01P 00900320 हे १५ वर्षाच्या विहित मुदतीनंतर ५ वर्षाची एक मुदतवाढ घेऊन ३० मार्च २००६ रोजी बंद करण्यात आले. त्यातून उपलब्ध झालेली पूर्वीच्या २० वर्षातील गुंतवणूक त्यावरील परताव्यासह. (४) १९९९ नंतरच्या १०-१२ वर्षातील कृषि उत्पन्न श्रीमती सुशिला भाऊराव देशमुख यांच्या नावे असलेल्या जंगम मालमत्तांचे स्वामित्व मुख्यत्वे या स्रोतावर आधारित आहे.

### पॅन कार्ड, आयकर विवरणपत्र व सिनिअर सिटीझन शिप

७७. कृषि उत्पन्नावर आयकर लागत नसतो पण इतर आयकरपात्र उत्पन्नावरील आयकर आकारतांना कृषि उत्पन्न लक्षात घेतले जाते. हे लक्षात घेता श्रीमती देशमुखांच्या बाबतीत आयकर विभागाचा पॅन क्रमांक (PAN) मिळविणे व आयकर विवरण पत्र भरणे अपरिहार्य झाले. पॅन कार्ड अभावी काही आर्थिक व्यवहार अडून पडतात. सन २००६ मध्ये आयकर विभागाचे पॅन कार्ड प्राप्त करुन घेण्यात आले व त्यानंतर सन २००५-०६ या आर्थिक वर्षापासून नियमितपणे दरवर्षी श्रीमती देशमुखांचे आयकर विवरणपत्र भरण्यात येत आहे. **नियत वयोमानानुसार श्रीमती देशमुखांना "सिनिअर सिटीझन शिप" याच काळामध्ये प्राप्त झाल्यामुळे मुळातील गुंतवणूकींची पूनर्रचना करावी लागली.**

### अनुत्पादक मालमत्ता

७८. श्रीमती देशमुखांच्या नावे असलेल्या शेतजमीन या मालमत्तेबाबतच्या गेल्या १० वर्षातील उत्पादकतेबाबतचे तपशील परिच्छेद ७५ मध्ये नमुद केले आहे. भाऊराव तु. देशमुख यांच्या नावे असलेली पण २००४ पर्यंत मोठ्या प्रमाणात अनुत्पादक असलेली मालमत्ता म्हणजे विधानमंडळ सदस्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये वैतरणा या इमारतीमध्ये असलेली सदनिका क्रमांक १००३ ही होय. (यापुढे उल्लेख 'सदनिका' असा)

### नकारार्थी उत्पादकता

७९. विधानमंडळ सदस्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये असलेली सदनिका या मालमत्तेची उत्पादकता सन २००४ च्या पूर्वी अनेक वर्षे निरंक होती. एवढेच नव्हे तर काळजीपूर्वक अवलोकनानंतर असे दिसून येते की ही मालमत्ता नकारार्थी परतावा (Negative Returns) देत होती. सन २००४ च्या दरम्यान दर तीन महिन्याला (१) सिंकिंग फंड रुपये ४५० (२) शासकीय भू-भाडे (लिजरेंट) रुपये १२४५ (३) महापालिका कर रुपये ५०७० (४) पाणी पट्टी रुपये ७५० (५) सामाईक विज आकार रुपये १३८० (६) इमारत वीमा रुपये ७५ (७) सेवा आकार (सर्व्हीस चार्जेस) रुपये १६५० (८) देखभाल निधी (मेंटेनन्स चार्जेस) रुपये १९८० अशी एकूण रक्कम रुपये १२,६०० दर तीन महिन्याला गृहनिर्माण संस्थेमध्ये नियमितपणे भरावी लागत असे. पुढे पुढे ही रक्कम २२ हजार रुपयाच्या वर गेली. या नियमित त्रैमासिक भरण्याशिवाय दरवर्षाला, इमारतीची रंगरंगोटी, नवी लिफ्ट बसविणे, सामाईक जागेचे सौंदर्यीकरण, या किंवा या सारख्या कामासाठी दरवर्षी काही निधी सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे जमा करावा लागत असे. अगदी सुरुवातीला हा त्रैमासिक भरणा बराच कमी होता. शिवाय तो मुद्दल व व्याजाच्या हप्त्यासोबत भरावा लागत असे, शिवाय वार्षिक भरणा सुरुवातीच्या काळात नव्हताच असे म्हटले तरी चालेल. सन २००४ च्या बुलेटीन प्रकाशनोत्तर या साऱ्या बाबींचा मी आढावा घेतला. **सतत ४ ते ५ हजार रुपये दर महिन्याला होणाऱ्या या खर्चाचा भुर्दंड सहन करण्याच्या स्थितीतुन बाहेर पडले पाहिजे असे मला वाटले व त्यानंतर ही सदनिका "संमती नि परवानगी करारनामा" (Leave and licence Agreement) तत्त्वावर वापरासाठी देण्याचा मी निर्णय घेतला.**

### करारनाम्याची नोंदणी आवश्यक

८०. महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९ (Maharashtra Rent Control Act 1999) म्हणजेच सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ च्या कलम ५५ अन्वये सदनिका वापरण्यासाठी "संमती नि परवानगी करारनामा" (Leave and licence Agreement) करण्यात आला असेल तर अशा प्रत्येक करारनाम्याची सन १९०८ च्या नोंदणी अधिनियमान्वये नोंदणी केली पाहिजे असे कायदेशीर बंधन आहे. त्याप्रमाणे अशा प्रत्येक करारनाम्याची नोंदणी करण्यात आली आहे. ती पुढील प्रमाणे :-

(१) **सन २००५-०६ :** दुय्यम निबंधक मुंबई शहर २ यांच्या नोंदणी कार्यालयात दिनांक २२ फेब्रुवारी २००५ रोजी पुस्तक क्रमांक १ मध्ये क्रमांक १६७२/२००५ वर नोंदला.

(२) **सन २००६-०७ :** दुय्यम निबंधक मुंबई शहर २ यांच्या नोंदणी कार्यालयात दिनांक २४ मार्च २००६ रोजी पुस्तक क्रमांक १ मध्ये क्रमांक २७९२/२००६ वर नोंदला.

(४) **सन २००७-०८ :** दुय्यम निबंधक मुंबई शहर २ यांच्या नोंदणी कार्यालयात दिनांक ५ एप्रिल २००७ रोजी पुस्तक क्रमांक १ मध्ये क्रमांक

***( सहपत्र : एक )***

**प्रा.बी.टी.देशमुख,**
विधानपरिषद सदस्य,
३, सुबोध कॉलनी,
विदर्भ महाविद्यालयाजवळ, **अमरावती.** - ४४४ ६०४

दिनांक : १६.०९.२००६
क्रमांक : विपसवे / १०१
फोन नं. नि. (०७२१) २५३००८०
का. (०७२१) २६६३६४६

प्रति,
**सचिव,** 'नुटा'
मा. महोदय,

स.न.वि.वि.

विधानपरिषद सदस्यत्वाच्या माझ्या पाचव्या कार्यकालापैकी सन २००५ हे पहिले पुर्ण वर्ष (कॅलेंडर ईयर) होय. त्या वर्षातील १२ महिन्यांसाठी विधानमंडळ सदस्य या नात्याने मिळालेले वेतन (Salary) मी संघटनेच्या सुपूर्त करण्याचा निर्णय घेतला आहे.

संघटनेच्या आपल्या स्वतःच्या स्थायी उद्भवातून मिळणारे नियमित उत्पन्न आपला खर्च भागविण्यासाठी जेमतेम पुरणारे आहे, याची मला जाणीव आहे. अशाही स्थितीत अनुशेष निर्मूलनाच्या कामी खटपट करण्याचे जे धोरणात्मक निर्णय आपल्या संघटनेच्या कार्यकारी मंडळाने व आमसभेने घेतले आहेत, त्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा तत्सम कामासाठी अल्प हातभार लावण्याच्या भावनेने मी उक्त निर्णय घेतलेला आहे.

आपला विनित
**(बी.टी.देशमुख)**
अध्यक्ष, 'नुटा' व विधानपरिषद सदस्य,

**सहपत्र :** कोषाध्यक्ष 'नुटा' यांचे नावे रुपये २४०००/- (चोविस हजार) साठी काढलेला सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा रेखाकिंत धनादेश क्रमांक ८०६९३ दिनांकित १६.०९.२००६

*(सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ७६ वरून पुनर्रमुद्रित. मुळ पत्र सन २००६ च्या ईएक्स फाईलच्या पृष्ठ ८१ वर समाविष्ट)*

२९७४/२००७ वर नोंदला.

(४) **सन २००८-०९ आणि सन २००९-१०** : दुय्यम निबंधक मुंबई शहर २ यांच्या नोंदणी कार्यालयात दिनांक ३० जून २००८ रोजी पुस्तक क्रमांक १ मध्ये क्रमांक ४०३२/२००८ वर नोंदला.

(५) **सन २०१०-११ आणि सन २०११-१२** : दुय्यम निबंधक मुंबई शहर २ यांच्या नोंदणी कार्यालयात दिनांक २३ जून २०१० रोजी पुस्तक क्रमांक १ मध्ये क्रमांक ४९४७/२०१० वर नोंदला.

**शासनाची परवानगी व शासनाकडे अधिमुल्याचा भरणा**

**८१.** "सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमिन देण्यासंबधी धोरण" या मथळ्याचा एक सविस्तर शासननिर्णय (क्रमांक एलसीएस १०९५/प्र.क्र.३७/९५ ज-१) दिनांक ९ जुलै १९९९ रोजी महाराष्ट्र शासनाने निर्गमित केला असून या शासननिर्णयाने (यापुढे उल्लेख शासननिर्णय असा) याबाबतचे सारे बारिक सारिक तपशील ठरवून दिले आहेत. सदरहू शासननिर्णयाच्या जोडपत्र 'ब' मध्ये "शासकीय जमिनी सहकारी गृहनिर्माण संस्थांना देण्याबाबतच्या अटी व शर्ती" नमूद केलेल्या आहेत. त्यातील परिच्छेद ९ मध्ये अशी अट आहे की सदनिकेची विक्री करावयाची असेल तर विक्री हस्तांतरण फी प्रत्येक चौरस फुटामागे ठरवून दिलेल्या दराने शासनाकडे जमा करावी लागेल. याच जोडपत्र 'ब' च्या परिच्छेद १० मध्ये पुढे अशी तरतुद आहे की, "**सदस्याने त्याची सदनिका भाड्याने दिल्यास वरील हस्तांतरण फी च्या रकमेच्या ५ टक्के दराने अधिमुल्य प्रतिवर्षी शासनाकडे भरावे लागेल.**" शासनाची परवानगी मिळाल्याबाबतचे व शासनाकडे अधिमुल्याचा भरणा केल्याचे तपशील पुढील प्रमाणे आहेत. :-

**(एक) सन २००५-०६ मधील कालावधीकरिता :- (अ) परवानगी मागणारा अर्ज :-** सदनिका परवाना पद्धतीने भाडेतत्त्वावर देण्यासाठी परवानगी मागणारा अर्ज श्री. भाऊराव तुळशीरामजी देशमुख यांनी जिल्हाधिकारी (मुंबई शहर विभाग, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई - ४०० ००१) यांचेकडे सादर केल्याचा दिनांक : २ एप्रिल २००५ **(ब) शासनाकडे अधिमुल्याची रक्कम रुपये १४२५० भरणा केल्याचे तपशील :-** Receipt No. 173824 Dated 15.04.2005 from Collector's office, Old Custom House, Mumbai-23., Issued to Shri. Bhaurao Tulshiramji Deshmukh, **(क) परवानगी मिळाल्याचे तपशील :-** जिल्हाधिकारी मुंबई यांनी त्यांच्या दिनांक ५ एप्रिल २००५ रोजीच्या पत्र क्रमांक सीएसएलआर/

***( सहपत्र : दोन )***

**प्रा.बी.टी.देशमुख,**
विधानपरिषद सदस्य
३, सुबोध कॉलनी,
विदर्भ महाविद्यालयाजवळ, **अमरावती.** - ४४४ ६०४

फोन नं. नि. (०७२१) २५३००८०
का. (०७२१) २६६३६४६

दिनांक : १४.०९.२००७
क्रमांक : विपसवे / १०२

प्रति,
**सचिव**, 'नुटा'
मा. महोदय,

स.न.वि.वि.

जलसिंचन प्रकल्पांच्या बाबतीत सर्व समाजाने, लोकप्रतिनिधींनी व शासनाने समोर येवून खंबीरपणे प्रकल्प बाधितांच्या सहाय्यासाठी धावले पाहिजे. लक्षावधी लाभधारकांनी या सर्व प्रकरणी मूक प्रेक्षकांची भूमिका न घेता ठामपणे प्रकल्पबाधितांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे, ते इतके की अत्यंत अल्पकाळात सर्व शासननिर्णयांनी देऊ केलेले सर्व लाभ प्रकल्पबाधितांना मिळावेत व त्यांच्यात आनंदाचे वातावरण निर्माण होऊन आपणच खरे लाभधारक आहोत, अशी भावना त्यांच्या मनामध्ये निर्माण झाली पाहिजे. महाराष्ट्राचा इतिहास असे सांगतो की, असे ज्या ज्या ठिकाणी झाले तेथे मोठमोठे सिंचन प्रकल्प २ किंवा ३ वर्षात, जास्तीत जास्त ४ किंवा ५ वर्षात उभे राहिले. याच्या उलट जेथे लक्षावधी लाभधारकांनी मूक प्रेक्षकांची भूमिका घेतली व काही शेकड्यात असलेल्या प्रकल्प बाधितांना वाऱ्यावर सोडून दिले, हा त्रास फक्त आपल्याच नशिबी आहे, कोणीहि आपल्या पाठीशी नाही अशी भावना त्यांच्या मनामध्ये निर्माण झाली तेथे एक प्रकल्प पूर्ण होण्याला ५० वर्षेसुद्धा कमी पडतात याचीही महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये नोंद आहे. विदर्भाच्या दप्तरात तर अशा अनेक नोंदी आहेत.

२. विदर्भातील फार मोठे क्षेत्र खारपाणपट्ट्यामध्ये आहे. या क्षेत्रामध्ये प्रकल्पस्थळ उपलब्धच होत नाही. असे असतांना निम्न पेढी प्रकल्पासाठी उत्तम प्रकल्पस्थळ उपलब्ध झाल्यानंतर काही मोजके लोक या प्रकल्पाला विरोध करीत आहेत. प्रकल्पबाधितांनी स्वेच्छेने सरळ खरेदी दिली असा एकही जलसिंचन प्रकल्प विदर्भात यापूर्वी झाला नाही. त्यामुळे मिळणारे लाभ प्रकल्प बाधितांना मिळत नाहीत. परिणामी असंतोष वाढत रहातो. **संघटनेच्या धोरणात्मक निर्णयाला अनुसरुन "असामान्य गुणवत्तेचा निम्न पेढी प्रकल्प" असा एक नुटा बुलेटीनचा विशेषांक प्रकाशनाच्या अंतिम टप्प्यामध्ये आहे. या प्रकाशनामुळे वस्तुस्थिती लोकांच्या समोर येईल व शेकडोंच्या संख्येने प्रकल्प बाधित व्यक्ती स्वेच्छेने सरळ खरेदी पद्धतीने शासनाला प्रकल्पासाठी जमिनी उपलब्ध करुन देतील, अशी मला मोठी आशा वाटते.** स्वेच्छेने सरळ खरेदी पद्धतीच्या एका नव्या इतिहासाला महाराष्ट्राचा भाग असलेल्या विदर्भात त्यामुळे सुरुवात होईल व इतर प्रकल्पांना सुद्धा प्रकल्पबाधितांच्या असंतोषाला तोंड द्यावे लागणार नाही अशी अपेक्षासुद्धा या प्रयत्नामागे आहे.

३. विधानपरिषद सदस्यत्वाच्या माझ्या पाचव्या कार्यकालापैकी सन २००६ हे दुसरे पुर्ण वर्ष (कॅलेंडर ईयर) होय. त्या वर्षातील १२ महिन्यांसाठी विधानमंडळ सदस्य या नात्याने मिळालेले वेतन (Salary) मी संघटनेच्या सुपूर्त करण्याचा निर्णय घेतला आहे.

४. संघटनेच्या आपल्या स्वतःच्या स्थायी उद्भवातून मिळणारे नियमित उत्पन्न आपला खर्च भागविण्यासाठी जेमतेम पुरणारे आहे, याची मला जाणीव आहे. अशाही स्थितीत बुलेटीन विशेषांकासाठी सदस्य व शिक्षकांनी दिलेल्या अल्प स्वेच्छाधिन निधी सहभागातून अनुशेष निर्मूलनाच्या कामी खटपट करण्याचे जे धोरणात्मक निर्णय आपल्या संघटनेच्या कार्यकारी मंडळाने व आमसभेने घेतले आहेत त्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा तत्सम कामासाठी अल्पसा हातभार लावण्याच्या भावनेने मी उक्त निर्णय घेतलेला आहे.

आपला विनित

**(बी.टी.देशमुख)**
अध्यक्ष, 'नुटा' व विधानपरिषद सदस्य,

**सहपत्र** : पत्राची प्रतिलीपी प्रा. डॉ. शितल तिवारी, कोषाध्यक्ष 'नुटा' यांना समादराने अग्रेषित, सोबत 'कोषाध्यक्ष 'नुटा' यांच्या नावे रुपये २४०००/- (चोविस हजार) साठी काढलेला सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा रेखाकिंत धनादेश क्रमांक ०४६२१९१ दिनांकित १४.०९.२००७.

*(सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ७७ वरून पुनर्रमुद्रित. मुळ पत्र सन २००७ च्या ईएक्स फाईलच्या पृष्ठ ५१ वर समाविष्ट)*

आरईव्ही/एलएनडी-३०४४/२७२९ अन्वये परवानगी प्रदान केली.

**(दोन) सन २००६-०७ मधील कालावधीकरिता :- (अ) परवानगी मागणारा अर्ज :-** सदनिका परवाना पद्धतीने भाडेतत्त्वावर देण्यासाठी परवानगी मागणारा अर्ज श्री. भाऊराव तुळशीरामजी देशमुख यांनी जिल्हाधिकारी (मुंबई शहर विभाग, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई - ४०० ००१) यांचेकडे सादर केल्याचा दिनांक : २८ एप्रिल २००६ **(ब) शासनाकडे अधिमुल्याची रक्कम रुपये १४२५० भरणा केल्याचे तपशील :-** Paid by Cheque No. 238548 Dated 28.04.2006 in Collector's office, Old Custom House, Mumbai-23, for the permissioon with the Application by Shri. Bhaurao Tulshiramji Deshmukh, **(क) परवानगी मिळाल्याचे तपशील :-** जिल्हाधिकारी, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक १६ मे, २००६ रोजीच्या पत्र क्रमांक सीएसएलआर/आरईव्ही/एलएनडी-३०४४/३३२५ अन्वये परवानगी प्रदान केली.

**(तीन) सन २००७-०८ मधील कालावधीकरिता :- (अ) परवानगी मागणारा अर्ज :-** सदनिका परवाना पद्धतीने भाडेतत्त्वावर देण्यासाठी परवानगी मागणारा अर्ज श्री. भाऊराव तुळशीरामजी देशमुख यांनी जिल्हाधिकारी (मुंबई शहर विभाग, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई - ४०० ००१) यांचेकडे सादर केल्याचा दिनांक : २२ मार्च २००७ **(ब) शासनाकडे अधिमुल्याची रक्कम रुपये १४२५० भरणा केल्याचे तपशील :-** Receipt No. 212642 Dated 30.03.2007 from Collector's office, Old Custom House, Mumbai-23, Issued to Shri. Bhaurao Tulshiramji Deshmukh, **(क) परवानगी मिळाल्याचे तपशील :-** जिल्हाधिकारी, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक २९ मार्च २००७ रोजीच्या पत्र क्रमांक सीएसएलआर/आरईव्ही/एलएनडी-३०४४/२९१६ अन्वये परवानगी प्रदान केली.

**(चार) सन २००८-०९ आणि २००९-१० मधील कालावधीकरिता :- (अ) परवानगी मागणारा अर्ज :-** सदनिका परवाना पद्धतीने भाडेतत्त्वावर देण्यासाठी परवानगी मागणारा अर्ज श्री. भाऊराव तुळशीरामजी देशमुख यांनी जिल्हाधिकारी (मुंबई शहर विभाग, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई - ४०० ००१) यांचेकडे सादर केल्याचा दिनांक : ३० जून २००८ **(ब) शासनाकडे अधिमुल्याची रक्कम रुपये १९००० भरणा केल्याचे तपशील :-** Paid by A

*( सहपत्र : तीन )*

**प्रा.बी.टी.देशमुख,**
विधानपरिषद सदस्य
३, सुबोध कॉलनी,
विदर्भ महाविद्यालयाजवळ,
**अमरावती.** - ४४४ ६०४

क्रमांक : विपसवे / १०३
फोन नं. नि. (०७२१) २५३००८०
का. (०७२१) २६६३६४६
दिनांक : १२.०५.२००८

प्रति,
**सचिव,** 'नुटा'
मा. महोदय,

स.न.वि.वि.

मा. मुंबई उच्च न्यायालयासमोर सुनावणी झालेल्या २००३ चे रिट पिटीशन क्रमांक ५८७२ मध्ये मा. न्यायालयाने दिनांक ६ मे, २००८ रोजी दिलेल्या निर्णयाची आपणा सर्वांना माहीती झालेली आहे. भारतीय संविधानाच्या खंड ३७१ (२) नुसार भारताच्या मा. राष्ट्रपतींनी काढलेले ९ मार्च १९९४ चे आदेश, त्या आदेशानुसार महाराष्ट्राच्या राज्यपालांनी निर्गमित केलेले आदेश व निदेश यांची अंमलबजावणी न होणे, त्यातून निधी वाटपासारख्या महत्वपूर्ण बाबतीत महाराष्ट्राच्या एकूणच अनुशेषग्रस्त भागाला व मुख्यत्वे विदर्भाला सातत्त्याने मिळणारी भेदभावपूर्ण वागणूक या सारख्या महत्त्वाच्या मुद्यांचे भवितव्य या याचिकेच्या निर्णयावर अवलंबून होते. **भारतीय संविधानाच्या खंड ३७१ (२) अन्वये उपलब्ध झालेल्या यंत्रणेच्या अस्तित्वाच्या निकालाचा महत्वपूर्ण विषय या दाव्यात अंतर्भूत होता हे जेवढे खरे; तेवढेच सतत वाढणाऱ्या अनुशेषामुळे शेकडो शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची पाळी यावी, ही जी ग्रहण लागल्यासारखी स्थिती एकूणच अनुशेषग्रस्त भागात व विशेषतः विदर्भात निर्माण झालेली होती त्यातून सुटका होण्यासाठी मदत करु शकणारा 'लहानसा प्रकाश किरण'सुद्धा या याचिकेच्या निमित्ताने आपल्या अस्तित्वासाठी लढत होता हेही खरे आहे.**

२. मा. उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयामध्ये स्पष्टपणे "Under Article 371, there is a special responsibility imposed on the Governor to ensure that there is no backwardness in Vidharbha and Marathwada regions and the same was a constitutional obligation imposed on the Governor, which cannot be frustrated." अशी भूमिका घेतली असून "Governor is fully empowered to make necessary allocation of funds to improve the backward areas like Marathwada and Vidharbha. The directives of the Governor are binding on the State." असा दिलेला निर्णय अनुशेषग्रस्त विदर्भाला निश्चितच दिलासा देणारा आहे. **हा संपूर्ण निकाल विशेष बुलेटीन छापून प्रसिद्ध करण्याचा संघटनेने घेतलेला निर्णय त्यामुळेच स्वागतार्ह आहे.**

३. विधानपरिषद सदस्यत्वाच्या माझ्या पाचव्या कार्यकालापैकी सन २००७ हे तिसरे पुर्ण वर्ष (कॅलेंडर ईयर) होय. त्या वर्षातील १२ महिन्यासाठी विधानमंडळ सदस्य या नात्याने मिळालेले वेतन (Salary) मी संघटनेच्या सुपूर्त करण्याचा निर्णय घेतला आहे.

४. संघटनेच्या आपल्या स्वतःच्या स्थायी उद्‌भवातून मिळणारे नियमित उत्पन्न आपला खर्च भागविण्यासाठी जेमतेम पुरणारे आहे, याची मला जाणीव आहे. अशाही स्थितीत बुलेटीन विशेषांकासाठी सदस्य व शिक्षकांनी दिलेल्या अल्प स्वेच्छाधिन निधी सहभागातून अनुशेष निर्मूलनाच्या कामी खटपट करण्याचे जे धोरणात्मक निर्णय आपल्या संघटनेच्या कार्यकारी मंडळाने व आमसभेने घेतले आहेत त्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा तत्सम कामासाठी अल्पसा हातभार लावण्याच्या भावनेने मी उक्त निर्णय घेतलेला आहे.

आपला विनित

**(बी.टी.देशमुख)**
अध्यक्ष, 'नुटा' व विधानपरिषद सदस्य,

**सहपत्र :** पत्राची प्रतिलीपी प्रा. डॉ. शितल तिवारी, कोषाध्यक्ष 'नुटा' यांना समादराने अग्रेषित, सोबत 'कोषाध्यक्ष 'नुटा' यांच्या नावे रुपये २४०००/- (चोविस हजार) साठी काढलेला सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा रेखाकिंत धनादेश क्रमांक १०३६२२ दिनांकित १२.०५.२००८.

*(सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ७८ वरून पुनर्रमुद्रित. मुळ पत्र सन २००८ च्या ईएक्स फाईलच्या पृष्ठ २७ वर समाविष्ट)*

Cheque No. 241917 on State Bank of India Mumbai dated 30.06.2008 for Rs. 19,000/- in favour of Collector of Mumbai City. **(क) परवानगी मिळाल्याचे तपशील :-** जिल्हाधिकारी, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक १४ नोव्हेंबर २००८ रोजीच्या पत्र क्रमांक मशा-२/टे-३/वरळी/सद.भाडे/एलएनडी ३०४४/ना.ह.प्र./०८ अन्वये परवानगी प्रदान केली.

**(पाच) सन २०१०-११ आणि २०११-१२ मधील कालावधीकरिता :- (अ) परवानगी मागणारा अर्ज :-** सदनिका परवाना पद्धतीने भाडेतत्त्वावर देण्यासाठी परवानगी मागणारा अर्ज श्री. भाऊराव तुळशीरामजी देशमुख यांनी जिल्हाधिकारी (मुंबई शहर विभाग, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई - ४०० ००१) यांचेकडे सादर केल्याचा दिनांक : २३ जून २०१० **(ब) शासनाकडे अधिमुल्याची रक्कम रुपये ९५०० भरणा केल्याचे तपशील :-** Paid by Cheque No. 738487 on State Bank of India Mumbai dated 23.06.2010 for Rs. 9,500/- issued by Shri.B.T.Deshmukh in favour of Collector of Mumbai City. **(क) परवानगी मिळाल्याचे तपशील :-** जिल्हाधिकारी मुंबई यांनी त्यांच्या दिनांक २३ जुलै २०१० रोजीच्या पत्र क्रमांक सीएसएलआर/आरईव्ही-२एलएनडी-१०/१८१ अन्वये परवानगी प्रदान केली.

### सहकारी गृहनिर्माण संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र व संस्थेकडे "नॉन ऑक्युपन्सी चार्जेस" चा भरणा

८२. परवाना पद्धतीने सदनिका भाडेतत्त्वावर देतांना दरवर्षाला जेवढी रक्कम अधिमुल्य म्हणून शासनाकडे भरावी लागते तेवढीच रक्कम दरवर्षी सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे "नॉन ऑक्युपन्सी चार्जेस" म्हणून भरावी लागेल व सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल अशी तरतुद आहे. त्याप्रमाणे वरळी सागर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या संस्थेकडे रक्कम भरणा केल्याचे व ना हरकत प्रमाणपत्र घेतल्याबाबतचे तपशील पुढील प्रमाणे आहेत. :-

**(एक) सन २००५-०६ मधील कालावधी करिता :- (अ) ना हरकत प्रमाणपत्रासाठी विनंती करणारा अर्ज :** अर्ज केल्याचा दिनांक :- २ एप्रिल

---

*( सहपत्र : चार )*

**प्रा.बी.टी.देशमुख,**
विधानपरिषद सदस्य, ३, सुबोध कॉलनी,
विदर्भ महाविद्यालयाजवळ, **अमरावती.** - ४४४ ६०४

क्रमांक : IV / एलसी/ ८३
फोन नं. नि. (०७२१) २५३००८० का. २६६३६४६
**दिनांक : २६.३.२००७**

प्रति,
**मा.जनमाहिती अधिकारी तथा,**
अप्पर कोषागार अधिकारी, अमरावती.

**विषय :** माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये विधानसभा व विधानपरिषद आजी माजी आमदाराचे मेडीकल बीलबाबत व अपत्य बाबतची माहिती सादर करण्याबाबत

**संदर्भ :-** (१) जिल्हा कोषागार कार्यालय, अमरावती यांचे पत्र क्रमांक कोष/अम/आस्था-४/मा.आ./कावि-१३२/०७ दिनांक १४ मार्च २००७.

(२) आपण संदर्भ १ वरील पत्रात नमुद केल्याप्रमाणे मा. डॉ. रावसाहेब पा. हाडोळे, माजी आमदार यांचा माहितीचा अधिकारमध्ये प्राप्त अर्ज

मा.महोदय,

आपल्या संदर्भ १ वरील पत्राप्रमाणे तीन मुद्यांबाबत आपण माहिती मागितली आहे. ती मुद्देनिहाय माहिती पुढील प्रमाणे :-

**मुद्दा क्र. १ :-** दिनांक १.१.२००५ पासून ते आजपर्यंत आजी-माजी आमदारांची किती मेडीकल बिले या कोषागारातून पास करण्यात आली आहे.

**माहिती :- मी सन १९८० पासून सातत्याने विधानपरिषदेचा सदस्य आहे. १९८० पासून तर सन २००५ पर्यंत कोषागारातून कोणत्याही प्रकारचे मेडीकल बील घेतलेले नाही.** सन २००६ च्या डिसेंबर महिन्यात नागपूर येथे झालेल्या विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात दिनांक ७.१२.२००६ रोजी सभागृहातील एका भाषणानंतर आलेल्या हृदय विकाराच्या आघाताने मला दिनांक ७ डिसेंबर २००६ रोजी वोक्हार्ट हॉस्पीटल, नागपूर येथे दाखल व्हावे लागले. ॲन्जीओग्राफी व एन्जीओप्लास्टीची उपाययोजना तेथे करण्यात आली. मा. सचिव, विधानमंडळ सचिवालय यांचा आदेश क्रमांक ५७३९२/म.वि.स./ह दिनांक १५.१२.२००६ अन्वये जिल्हा कोषागार कार्यालय, अमरावती येथून १ लक्ष रुपयाचा ॲडव्हान्स म्हणून वोक्हार्ट हॉस्पीटल नागपूर यांचे नावे रेखांकित धनादेश क्रमांक ६०५८८६ दिनांकीत १८.१२.२००६ रोजी अदा करण्यात आला. या काळातील उपाययोजना व औषधोपचाराचा नियमाप्रमाणे मान्य (Admissible expenditure) खर्च म्हणून मा. सचिव, विधानमंडळ सचिवालय यांच्या आदेश क्रमांक ३११४/म.वि.स./ह दिनांक १३.०२.२००७ अन्वये जिल्हा कोषागार कार्यालय, अमरावती येथून १,५३,६१३/- रुपये वोक्हार्ट हॉस्पीटल, नागपूर यांचे नावे रेखांकित धनादेश क्रमांक ६१२३६९ दिनांकीत १७.०२.२००७ अन्वये अदा करण्यात आला. नियमाप्रमाणे देय नसलेला किंवा मान्य न होवू शकलेला खर्च मी व्यक्तिशः भरावयाचा/भरलेला आहे.

ॲन्जीयोप्लास्टी नंतर औषधोपचार व विविध चाचण्याकरिता वोक्हार्ट हॉस्पीटल नागपूर यांचे अंदाजे ४०,०००/- रुपयाचे बिल बाकी असून ते अदा करणे प्रक्रियाधीन आहे.

**मुद्दा क्र. २ :-** तीन पेक्षा अधिक अपत्य आहेत अशा आमदारांची नावे.

**माहिती :-** मला दोन विवाहित मुली असल्याने माझे बाबतीत हा मुद्दा गैरलागू आहे.

**मुद्दा क्र. ३ :-** तीन पेक्षा अधिक अपत्य असल्यास कुटूंब नियोजन केल्याचे प्रमाणपत्र सादर केले होते काय?

**माहिती :-** दोन पेक्षा जास्त अपत्य नसल्यामुळे हा प्रश्न उद्‌भवत नाही.

संदर्भ १ वर नमुद केलेल्या आपल्या पत्रामध्ये आपण असे नमूद केलेले आहे की :- "माहितीचा अधिकार नियम -२००५ चे नियमानुसार त्रयस्थ पक्षाशी संबंधित असलेली गोपनीय माहीती, माहीतीचे अधिकारात पुरवितांना पुरवावयाची झाल्यास त्रयस्थ पक्षाची संमती आवश्यक आहे. माहितीचा अधिकार कलम ११ (१) (२) नूसार दहा दिवसात त्रयस्थ पक्षाने संमती द्यावयाची आहे. तरी आपणास विनंती की आपल्या वैद्यकिय देयकाविषयी माहितीच्या अधिकारात मागण्यात आलेली माहिती देण्यासाठी आपली संमती आहे किंवा नाही हे कृपया त्वरीत कळवावे."

**लोकप्रतिनीधी हे लोकांचे प्रतिनिधी असल्याने, त्या नात्याने त्यांना मिळणाऱ्या सुविधा जाणून घेण्याचा लोकांना अधिकार आहे. अशी माझी धारणा आहे. त्यामुळेच माहितीचा अधिकार कलम ११ (१) (२) नूसार वैद्यकीय देयकांविषयी माहितीच्या आधिकारात मागण्यात आलेली माहिती देण्यासाठी माझी संमती आहे हे मी कळवित आहे.**

आपला विश्वासू
**(बी.टी.देशमुख)**
विधानपरिषद सदस्य

२६.३.२००७
मिळाल्याबद्दल सही व शिक्का
आवक लिपिक,
जिल्हा कोषागार, अमरावती

पत्राची प्रतिलिपी मा. डॉ. रावसाहेब पा.हाडोळे, मु.पो. धनेगाव ता. अंजनगाव जि. अमरावती यांना माहितीसाठी समादराने अग्रेषित.

२००५ **(ब) "नॉन ऑक्युपन्सी चार्जेस" चा भरणा** :- वरळीसागर सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे "नॉन ऑक्युपन्सी चार्जेस" रुपये १४२५० भरणा केल्याचा तपशील : गृहनिर्माण संस्थेने दिनांक ४ एप्रिल २००५ रोजी उपरोक्त रकमेचा भरणा झाल्याबद्दल दिलेली पावती क्रमांक १५९०६. **(क) ना हरकत प्रमाणपत्र प्रदान** :- सहकारी गृह निर्माण संस्थेने ना हरकत प्रमाणपत्र प्रदान केल्याचा दिनांक :- ८ एप्रिल २००५.

**(दोन) सन २००६-०७ मधील कालावधी करिता :- (अ) ना हरकत प्रमाणपत्रासाठी विनंती करणारा अर्ज** : अर्ज केल्याचा दिनांक :- २८ एप्रिल २००६ **(ब) "नॉन ऑक्युपन्सी चार्जेस" चा भरणा** :- वरळीसागर सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे "नॉन ऑक्युपन्सी चार्जेस" रुपये १४२५० भरणा केल्याचा तपशील : गृहनिर्माण संस्थेने दिनांक २८ एप्रिल २००६ रोजी उपरोक्त रकमेचा भरणा झाल्याबद्दल दिलेली पावती क्रमांक १७१२६. **(क) ना हरकत प्रमाणपत्र प्रदान** :- सहकारी गृह निर्माण संस्थेने ना हरकत प्रमाणपत्र प्रदान केल्याचा दिनांक :- २८ एप्रिल २००६.

**(तीन) सन २००७-०८ मधील कालावधी करिता :- (अ) ना हरकत प्रमाणपत्रासाठी विनंती करणारा अर्ज** : अर्ज केल्याचा दिनांक :- १२ मार्च २००७ **(ब) "नॉन ऑक्युपन्सी चार्जेस" चा भरणा** :- वरळीसागर सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे "नॉन ऑक्युपन्सी चार्जेस" रुपये १४२५० भरणा केल्याचा तपशील : गृहनिर्माण संस्थेने दिनांक ४ एप्रिल २००७ रोजी उपरोक्त रकमेचा भरणा झाल्याबद्दल दिलेली पावती क्रमांक १८१०२. **(क) ना हरकत प्रमाणपत्र प्रदान** :- सहकारी गृह निर्माण संस्थेने ना हरकत प्रमाणपत्र प्रदान केल्याचा दिनांक :- ४ एप्रिल २००७.

*(परिशिष्ट : ११)*

# जंगम मालमत्तांचे विवरणपत्र - सन २०१०

या परिशिष्टामध्ये जंगम (Movable properties) मालमत्तांचे विवरण दिलेले आहे. प्रत्येक मालमत्तेचे तपशील दिले असून त्या मालमत्तेच्या संपादनासाठी वापरलेल्या निधीचे स्रोत परिच्छेद ७६ व ८६ मध्ये नमुद केलेले आहेत.

(१) **सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी १९६८ (Public Provident Fund Scheme 1968)** : करपात्र उत्पन्नामध्ये किंवा निर्धारित करामध्ये मोठी वजावट देणाऱ्या गुंतवणूकीचा हा पहिला प्रकार म्हणता येईल. उत्पन्नावरील निर्धारित करामध्ये मोठी वजावट या गुंतवणूकीमुळे मिळते. १५ वर्षाच्या आत खाते बंद करता येत नाही. **(अ)** ३१ मार्च १९८६ ला सुरु केलेले याबाबतचे श्रीमती सुशिला भाऊराव देशमुख यांचे पहिले खाते १५ वर्षाच्या मुदतीनंतर ५ वर्षाची एक मुदतवाढ घेऊन ३० मार्च २००६ रोजी बंद करण्यात आले. त्यानंतर २००६ मध्ये सुरु करण्यात आलेले पीपीएफ खाते क्रमांक ११०६२५२२९९-० या खात्यातील विद्यमान रक्कम रुपये ७१,५०५.०० आहे. **(ब)** आज सुरु असलेले भाऊराव तुळशीरामजी देशमुख यांचे पीपीएफ खाते क्रमांक ११०६२५३४५०-८. या खात्यातील विद्यमान रक्कम रुपये १.८२,६९८.६३ आहे.

(२) **म्युच्युअल फंड** :- करपात्र उत्पन्नामध्ये किंवा निर्धारित करामध्ये मोठी वजावट देणाऱ्या गुंतवणूकीचा हा दुसरा प्रकार म्हणता येईल. **(अ)** नामे श्रीमती सुशिला भाऊराव देशमुख, तपशील पुढील प्रमाणे :- (1) SBI Magnum Tax Gain 93 Units : 8060.703 (2) Kotak Tax Saver Units : 11672.045 (3) Rel. R.S.F.E.P.D. Units 2135.81 bought at the price of Rs. 244710.00, Rs. 76001.35 and Rs. 44366.26 respectively. Schemes mentioned at 1 & 2 above are the tax saver schemes. **(ब)** नामे श्री. भाऊराव तुळशिरामजी देशमुख, तपशील पुढील प्रमाणे :- (1) HDFC Tax Saver Units : 7009.549 (2) Kotak Tax Saver Units : 6972.878 bought at the price of Rs. 300000.10 and Rs. 46000.00. respectively Schemes mentioned at 1 & 2 above are the tax saver schemes उभय खात्यात वेगवेगळ्या करनिर्धारण वर्षात हे युनिटस् घेतले असले तरी ते येथे एकत्रित दर्शविले आहेत.

(३) **सहा वर्षीय राष्ट्रीय बचत पत्रे (आठवी मालिका)** : करपात्र उत्पन्नामध्ये किंवा निर्धारित करामध्ये मोठी वजावट देणाऱ्या गुंतवणूकीचा हा आणखी एक प्रकार म्हणता येईल. (नामे श्रीमती सुशिला भाऊराव देशमुख) सन २००५ नंतरच्या वर्षात आयकर विवरणपत्र भरत असतांना कर उत्पन्नात वजावट मिळावी म्हणून एका वेळी चाळीस हजार रुपये याप्रमाणे चार वेळा केलेली ही एकूण गुंतवणूक १ लक्ष ६० हजार रुपये आहे.

(४) **सिनिअर सिटीझन्स सेविंग्ज स्किम २००४** :- या योजनेमध्ये श्रीमती सुशिला भाऊराव देशमुख यांचे नावे गुंतविलेली रक्कम रुपये १० लक्ष. २००४ च्या मुळ निवेदनाच्या परिशिष्ट ८ मध्ये क्रमांक ३ व ४ वर असलेल्या बँकेतील मुदती ठेव व पोस्टाची मासिक प्राप्ती योजना (मुदत पूर्ण केल्यावर बोनससह) या दोनही गुंतवणूकी त्या मानाने कमी लाभदायक असल्याने व नियत वयोमानानुसार श्रीमती देशमुखांना "सिनिअर सिटीझन शिप" याच काळामध्ये प्राप्त झाल्यामुळे, त्या गुंतवणूकी, त्यावरील परताव्यासह "सिनिअर सिटिझन्स सेविंग्ज स्कीम २००४" या ज्येष्ठ नागरिक योजनेमध्ये गुंतविण्यात आल्या.

(५) **दिर्घमुदती समभागातील गुंतवणूक :- (अ)** (नामे श्रीमती सुशिला भाऊराव देशमुख) या खात्यावरील गुंतवणूक पुढील प्रमाणे आहे. (1) Face Value of the Share is shown in the bracket after the Name of the Company :- (A) RIL (Rs. 10000) (B) TCS (Rs. 900) Total Face Value of the Shares is Rs. 10900.00 & Actual Purchase Value is Rs 1349492.44. Market value of the shares may be as per the Bulletin of the NSE of a given day. **(ब)** नामे, श्री. भाऊराव तुळशीरामजी देशमुख यांच्या खात्यावर असलेल्या या गुंतवणूकीचा संपूर्ण तपशील वर परिच्छेद ८५ मध्ये नमुद केला आहे.

(६) **अपरिवर्तनीय रोखे** : नामे श्रीमती सुशिला भाऊराव देशमुख एल अँड टी फायनान्स या कंपनीचे अपरिवर्तनीय रोखे (NCD) एकूण गुंतवणूक १ लक्ष रुपये .

(७) **भारत सरकारचे सेविंग्ज बॉंड २००३** : नामे सुशिला भाऊराव देशमुख यातील गुंतवणूक रुपये एक हजार (रुपये १०००.००) (Government of India Bond : Rs. 1000 )

(८) **वरिष्ठ पेन्शन विमा योजना** : नामे, श्री. भाऊराव तुळशीरामजी देशमुख. या योजनेमध्ये गुंतविलेली रक्कम रुपये २,५५,८४५ एवढी आहे. (सन २००४ च्या मुळ निवेदनाच्या परिशिष्ट ८ मध्ये क्रमांक १ वर या गुंतवणूकीचे तपशील नमूद केलेले आहेत.) ही त्यावेळी केलेली १५ वर्षे मुदतीची गुंतवणूक असल्याने आजही ती सुरु आहे.

(९) **"दागदागिने** :- प्रतिज्ञापत्रामध्ये 'ज्युवेलरी'चे तपशील द्यायला सांगितले आहेत. 'ज्युवेल' या शब्दाचा 'रत्न' व 'ज्युवेलरी' या शब्दाचा 'जडजवाहीर' असा अर्थ शासन व्यवहार कोषामध्ये नमूद आहे. हे दोनही शब्द जरा जड वाटल्याने मी दागदागिने हा जरा कमी वजनदार शब्द वापरला आहे. याबाबतीत माझे खाते Nil असून श्रीमती देशमुखांच्या खात्यावर विवाह प्रसंगी मिळालेले सुवर्णालंकार एकूण ३६० ग्रॅम वजनाचे असून त्याची आजची किम्मत रुपये २,३०,२०० आहे." सन २००४ च्या मुळ निवेदनाच्या परिशिष्ट ८ मध्ये क्रमांक ७ वर या गुंतवणूकीचे तपशील उपरोक्त शब्दात नमुद करण्यात आले असून तो मजकूर शब्दशः वर जसाच्या तसा दिलेला आहे. अर्थातच त्या मजकूरातील आजची किम्मत ही २००४ मधील आहे. सुर्वणाचे वाढलेले भाव लक्षात घेता आजची (२०१०) किम्मत ६,९०,२८० रुपये धरलेली आहे.

(१०) **वाहन** :- टाटा सुमो या गाडीची आजची किम्मत दोन लक्ष एक रुपये धरलेली आहे. मूळात १९९८ मध्ये ४ लक्ष रुपयापेक्षा जास्त किंमतीला घेतलेली ही गाडी संघटनेतर्फे मला उपलब्ध करुन देण्यात आली होती.

जवळील नगदी पैसे व व्यवहाराच्या दैनंदिन बँक बचत खात्यातील निधी याचे तपशील प्रतिज्ञापत्रातच नमूद आहेत. जंगम मालमत्तांबाबतचे समग्र निवेदन संपलेले आहे.

**(चार) सन २००८-०९ आणि २००९-१० मधील कालावधी करिता :- (अ) ना हरकत प्रमाणपत्रासाठी विनंती करणारा अर्ज :** अर्ज केल्याचा दिनांक :- ३० जून २००८ **(ब) "नॉन ऑक्युपन्सी चार्जेस" चा भरणा :-** वरळीसागर सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे "नॉन ऑक्युपन्सी चार्जेस" रुपये ९५०० अधिक ९५०० भरणा केल्याचा तपशील : गृहनिर्माण संस्थेने दिनांक ३० जून २००८ आणि ९ सप्टेंबर २००९ रोजी उपरोक्त रकमेचा भरणा झाल्याबद्दल दिलेली पावती क्रमांक अनुक्रमे १९५५४ आणि ३८२. **(क) ना हरकत प्रमाणपत्र प्रदान :-** सहकारी गृह निर्माण संस्थेने ना हरकत प्रमाणपत्र प्रदान केल्याचा दिनांक :- ३० जून २००८.

**(पाच) सन २०१०-११ आणि २०११-१२ मधील कालावधी करिता :- (अ) ना हरकत प्रमाणपत्रासाठी विनंती करणारा अर्ज :** अर्ज केल्याचा दिनांक :- २३ जून २०१० **(ब) "नॉन ऑक्युपन्सी चार्जेस" चा भरणा :-** वरळीसागर सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे "नॉन ऑक्युपन्सी चार्जेस" रुपये ९५०० भरणा केल्याचा तपशील : गृहनिर्माण संस्थेने दिनांक २८ जून २०१० रोजी उपरोक्त रकमेचा भरणा झाल्याबद्दल दिलेली पावती क्रमांक ३१५. **(क) ना हरकत प्रमाणपत्र प्रदान :-** सहकारी गृह निर्माण संस्थेने ना हरकत प्रमाणपत्र प्रदान केल्याचा दिनांक १४ सप्टेंबर २०१०.

**करारनाम्यातील प्रमुख बाबी**

८३. याबाबतचा जो "सम्मती नि परवानगी करारनामा" पंजीबद्ध करण्यात येतो त्याच्या नमुन्यामध्ये तीन महत्त्वाचे भाग दिसून येतात. (१) वापर परवानगीच्या मालमत्तेचे वर्णन (२) दर महिन्याला परवानगी धारकाने परवाना देणाराला द्यावयाचे भाडे (३) परवानगी धारकाने परवाना देणाराकडे जमा करावयाची बिनव्याजी जमाठेव (Refundable interest free deposit). प्रत्येक प्रकरणपरत्वे त्या करारनाम्याच्या नमुन्यात लहान मोठे बदल केले जातात पण त्यातील मुख्य मजकूर वर प्रमाणे ३ भागात नमूद केलेला असतो. पंजिबद्ध करण्यात आलेल्या २००५ पासूनच्या सर्व करारनाम्याचे अवलोकन केल्यास सरासरीने असे डिपॉझिट २० लक्ष रुपये होते व आजही ते तसे आहे. (एका वर्षी १०, दुसऱ्या एका वर्षी ३० व इतर प्रत्येक वर्षी २० याप्रमाणे)

*(परिशिष्ट : १२)*

Affidavit to be furnished by the candidate alongwith nomination paper
Before the Returning Officer for election to
**Maharashtra Legislative Council**
from Amravati Division Graduates' constituency

I, BHAURAO TULSHIRAMJI DESHMUKH son ~~/ daughter / wife~~ of TULSHIRAM DADUJI DESHMUKH aged 71 years, resident of No. 3, Subodh Colony, Vidarbha Mahavidyalaya Road, Amravati - 444 604, candidate at the above election, do hereby solemnly affirm and state on oath as under :-

(1) The following case ~~(s)~~ is ~~/are~~ pending against me in which cognizance has been taken by the court :-

(i) Section of the Act and description of the offence for which cognizance taken : Section 12 of the contempt of court Act for contempt of court.

(ii) The Court which has taken cognizance : Nagpur Bench of the Bombay High Court

(iii) Case No. : Criminal contempt Petition No. 10 of 2010 ( M/s Indiabulls Power Limited V/s Society for Backlog Removal and Development, Amravati (Help Line) Amravati & its' President Mr. B.T. Deshmukh, Amravati and others)

(iv) Date of order of the Court taking cognizance : 28.10.2010 of which there is no authorized communication till today.

(v) Details of appeal(s)/application(s) for revision etc.if any, filed against above order taking cognizance : No appeal filed till this date as there is no service of notice.

(2) That I give herein below the details of the assets (immovable, movable, bank balance, etc.) of myself, my spouse and dependents *:-

(A) DETAILS OF MOVABLE ASSETS.

S.No. **Description** (A) SELF (Prof.B.T.Deshmukh) (B) SPOUSE (Sau.Sushila Deshmukh)

**(i) Cash :- (A) (Prof.B.T.Deshmukh)** : Rs. 18,000 **(B) (Sau.Sushila Deshmukh) :** Rs. 13,000

**(ii) Deposits in Banks,Financial Institutions and Non-Banking Financial Companies :- (A) (Prof.B.T.Deshmukh) :** Savings Accounts Rs. 60,665.78 (1) HDFC Tax Saver Units : 7009.549 (2) Kotak Tax Saver Units : 6972.878 bought at the price of Rs. 300000.10 and Rs. 46000.00. respectively Schemes mentioned at 1 & 2 above are the tax saver schemes **(B) (Sau.Sushila Deshmukh) :** Savings Accounts Rs. 43,259.19 (1) SBI Magnum Tax Gain 93 Units : 8060.703 (2) Kotak Tax Saver Units : 11672.045 (3) Rel. R.S.F.E.P.D. Units 2135.81 bought at the price of Rs. 244710.00, Rs. 76001.35 and Rs. 44366.26 respectively. Schemes mentioned at 1 & 2 above are the tax saver schemes.

(iii) **Bonds,Debentures and Shares in companies :- (A) (Prof.B.T.Deshmukh) :** Face Value of the Share is shown in the bracket after the Name of the Company :- 1. TCS (Rs. 8201) 2. L & T (Rs. 1400) 3. GAIL (Rs. 42000) 4. RIL (Rs. 23000) 5. Cr.Greaves (Rs. 10000) 6. HCC (Rs. 10900) 7. Ster.Ind (Rs. 10100) Total Face Value of the Shares is Rs. 1,05,501.00 & these shares are bought at the price of Rs. 46,40.312.74. After deducting the amount of Rs. 20 lacs (Refundable interest - free deposit as per agreement registered on 23.6.2010 at page 4947 of 2010 in book No.1 in the Joint - Sub Registar's office Mumbai City-2) the actual amount of Investment is Rs. 26,40,312.74. Market value of the shares may be as per the Bulletin of the NSE of a given day.**(B) (Sau.Sushila Deshmukh) :** (1) Face Value of the Share is shown in the bracket after the Name of the Company :- (A) RIL (Rs. 10000) (B) TCS (Rs. 900) Total Face Value of the Shares is Rs. 10900.00 & Actual Purchase Value is Rs 1349492.44. Market value of the shares may be as per the Bulletin of the NSE of a given day. (2) L & T Finance 10.24 Non Convertible Debuntures : Rs. 1,00,000 (3) Government of India Bond : Rs. 1000

**(iv) Other Financial instruments NSS, Postal Savings, LIC Policies, etc.:- (A) (Prof.B.T.Deshmukh)** : P.P.F. A/c :- Rs. 1,82,698.63, Varishtha Pension Bima Yojana - Rs. 2,55,845 **(B) (Sau.Sushila Deshmukh) :** (1) P.P.F. A/c :- Rs. 71,505 (2) Senior Citizens Savings Scheme 2004 : Rs. 10 lacs (3) National Savings Certificates : Rs. 1,60,000

**(v) Motor Vehicles (details of Make. etc.) :-** (A) (Prof.B.T.Deshmukh) : TATA SUMO DX Rs. 2,00,001 (B) (Sau.Sushila Deshmukh) : Nil

**(vi) Jewellery (give details of weight and value) :-** (A) (Prof.B.T.Deshmukh) : Nil (B) (Sau.Sushila Deshmukh) Gold Ornaments 360 Gram Rs. 6,10,300

**(vii) Other assets, such as values of claims/interests :-** (A) (Prof.B.T.Deshmukh) : Nil (B) (Sau.Sushila Deshmukh) : Nil

B. DETAILS OF IMMOVABLE ASSETS

S. No. **Description** (A) SELF (Prof.B.T.Deshmukh) (B) SPOUSE (Sau.Sushila Deshmukh)

**(i) Agricultural Land** - Location(s) - Survey number(s) - Extent (Total measurement) - Current market value :-**(A)**

*उमेदवारी अर्जासोबत दाखल केलेले प्रतिज्ञापत्र येथे जसेच्या तसे शब्दशः उद्धृत केलेले आहे. फरक एवढाच आहे की तेथे सादर करतांना तक्ता पद्धतीने ठरवून दिलेल्या नमुन्यात सादर केलेले आहे व येथे ते धावत्या मजकुराच्या स्वरुपात मुद्रीत केलेले आहे. - **बी.टी.देशमुख***

**करारनाम्याचे संपुष्टीकरण**

८४. करारनामा ११ महिन्याच्या मुदतीनंतर संपुष्टात येईल किंवा उभयपक्षी कोणालाही २ महिन्याच्या पूर्वसूचनेने तो संपुष्टात आणता येईल. **दोनपैकी कोणत्याही कारणाने करारनामा संपुष्टात आल्यास २० लक्ष रुपयाची बिनव्याजी ठेव तातडीने परत करावी लागणार.** यापूर्वी एवढ्या मोठ्या रकमेची गुंतवणूक हाताळण्याची कोणतीही वेळ माझ्यावर आलेली नव्हती. ही जमा ठेव स्थावर मालमत्तेत गुंतविल्यास किंवा इतर गुंतवणुकीत अन्यत्र गुंतविल्यास ती परत करतांना अनेकांना झालेल्या यातायातीची मला माहिती होती. शिवाय या व्यवहारामुळे मी मुळातच आयकराच्या सर्वात वरच्या दराने कर भरणाऱ्या करदात्यांच्या वर्गात समाविष्ट झालो होतो. आयकरदायित्व वाढविणाऱ्या प्रकारात गुंतवणूक करण्याचे टाळता आले तर टाळावे हेही उद्दिष्ट समोर होते.

**दिर्घ मुदती समभागात गुंतवणूक**

८५. वेळ आल्यास कोणत्याहि क्षणी जमाठेव परत करता येईल ही गुंतवणूकीची गुणवत्ता कायम ठेवून सर्व विचारांती ठेव रक्कम व दर महिन्याला या व्यवहारातून येणारे बहुतांश उत्पन्न उत्तम कंपन्यांच्या समभागात दिर्घमुदती गुंतवणूक म्हणून ठेवण्याचा निर्णय घेतला. **तत्परतेने रोखतेमध्ये रुपांतरीतता ह्या या गुंतवणूकीच्या गुणवत्तेला जादा महत्व देण्यात आले.** नाही म्हटले तरी (१) त्या गुंतवणूकीवर मिळणारे 'डिव्हीडंड'चे उत्पन्न, आयकर कायद्यानुसार पूर्णपणे करमुक्त असते. (२) त्याचबरोबर एक वर्षानंतर काढलेल्या/काढल्यास समभागापासून झालेल्या लाभाला आयकर कायद्याच्या परिभाषेत "दिर्घ मुदती गुंतवणूकीवरील भांडवली लाभ" (Long term capital gains) असे संबोधिले जाते व अशा लाभापासून होणारे उत्पन्न पूर्णपणे करमुक्त असते. हे आणखीचे दोन लाभ या गुंतवणूकीतून होतात. अशी गुंतवणूक ही बरीच असुरक्षित समजली जाते. गुंतवणूक व्यवस्थापन करणाऱ्या उत्तम बँकेच्या नियंत्रणात व ठरलेला मेहनताना देवून तज्ञ संपर्क व्यवस्थापक (Relationship Manager) वा तज्ञ गुंतवणूक देखरेखदार(Portfolio Manager) यांच्या देखरेखीखाली ही गुंतवणूक ठेवल्यास अशी असुरक्षितता बरीच कमी करता येते. त्याबाबतची पूर्ण खबरदारी घेऊनच ही गुंतवणूक करण्यात आलेली आहे. ती पुढील प्रमाणे आहे :- Face Value of the Share is shown in the bracket after

**(Prof.B.T.Deshmukh) :** NIL **(B) (Sau.Sushila Deshmukh) :** Mauje - Navsari Pra. Nandgaon Peth S.No. 11 [+] (1) 4 Acre 30 Gunthe @ Cmv : Rs. 1,77,720 (2) 2 Acre 19 Gunthe @ Cmv : Rs. 1,15,427 * Cmv : of 1 and 2 : Rs. 2 Crore

**(ii) Non-Agricultural Land** - Location(s) - Survey number(s) - Extent (Total measurement) - Current market value :- **(A) (Prof.B.T.Deshmukh) :** (1) Mauje Navasari S.No. 41/2 Plot No. 1, 3 [&] (5000, 3000 Sq.Ft.) @ Cmv : Rs. 75,828, 30,218, (2) Mauje Navasari S.No. 121/3-4 Plot No 1, (Sq.Ft.3331) @ Cmv : Rs. 53,396 * Cmv : of 1 and 2 : Rs. 43 Lacs **(B) (Sau.Sushila Deshmukh) :** Mauje Navasari S.No. 41/2 Plot No 2, 4, 5 [&] (3000, 3000, 3000 Sq.Ft.) @ Cmv : Rs. 30,218, 30,218, 30,218 * Cmv : of Plot No 2, 4, 5 : Rs. 45 Lacs

**(iii) Buildings** (commercial and residential) - Location(s) - Survey/ door number(s) - Extent (Total measurement) - Current market value :- **(A) (Prof.B.T.Deshmukh) :** Residential House [#] on Plot No. 3, Subodh Colony Navasari 2000 Sq.Ft. @ Cmv : Rs.10,36,700 * Cmv : Rs. 25 Lacs (B) (Sau.Sushila Deshmukh) : NIL

**(iv) Houses/Apartments, etc.** - Location(s) - Survey/ door number(s) - Extent (Total measurement) - Current market value :- **(A) (Prof.B.T.Deshmukh) :** Worli Sagar Co-Operative Housing Society, Mumbai Apartment No. 1003, [$] Vaitarana 950 Sq. Ft. @ Cmv : Rs. 35,54,400 * Cmv : Rs. 1.5 Crore (B) (Sau.Sushila Deshmukh) : NIL

**(v) Others** (such as interest in property) :- (A) (Prof.B.T.Deshmukh) : NIL (B) (Sau.Sushila Deshmukh) : NIL

3) I give herein below the details of my **liabilities/ overdue** to public financial institution and government dues :-

Sr. No., Description, Name and address of Bank/Financial Institution(s) department(s), Amount outstanding as on 06.11.2010

**(a)**

(i) Loans from banks :- Nil

(ii) Loans from financial institutions :- Nil

(iii) Government dues

(a) Dues to departments dealing with government accommodation :- Nil

(b) Dues to departments dealing with supply of water :- Nil

(c) Dues to departments dealing with supply of electricity :- Nil

(d) Dues to departments dealing with telephones :- Nil

(e) Dues to departments dealing with government transport (including aircrafts and helicopters) :- Nil

(f) Other dues if any :- Refundable interest free deposit of Rs. 20 lacs, to be Refunded, as per agreement registered on 23.6.2010 at page 4947 of 2010 in book No.1 in the Joint - Sub Registar's office Mumbai City-2 ..... Rs. 20,00,000.00

**(b)**

(i) Income Tax including surcharge (Also indicate the assessment year up to which Income Tax Return filed. Give also permanent Account Number (PAN):- **(1)** Income Tax Return filed upto A.Y. 2010-2011 **(2)** For Assessment Year - 2010-2011, Return Filed on 17.05.2010. ACK No. 000013. **(3)** Tax paid Rs. 1,66,787.00 for A.Y. 2010-2011 **(4)** PAN NO. : AASPD 9512 C

(ii) Wealth Tax (Also indicate the assessment year up to which wealth Tax return filed) :- N.A.

(iii) Sales Tax (Only in case of proprietary business) :- N.A.

(iv) Property Tax :- Paid

(4) My educational **qualifications** are as under :-

(A) SSC of Vidarbha Board of Secondary Education in 1958 from Shri. Shivaji High School, Main Branch, Amravati.

(B) B.A. of Nagpur University in 1962 from Vidarbha Mahavidyalaya, Amravati.

(C) M.A. in Political Science of Nagpur University in 1964 from Vidarbha Mahavidyalaya, Amravati.

(B.T.Deshmukh)

DEPONENT

VERIFICATION

I, the deponent above named, do hereby verify and declare that the contents of this affidavit are true and correct to the best of my knowledge and belief; no part of it is false and nothing material has been concealed therefrom.

**VERIFIED** at AMRAVATI this the 6th day of November 2010.

(B.T.Deshmukh)

DEPONENT

FOR : + & # $ @ * SEE NOTES 1 to 6

[+] Note 1 : No. (1) was purchased on 17.5.1974 at Rs. 20,000 and No. (2) on 23.4.1979 at Rs. 14988

[&] Note 2 : Plot No. 1 was purchased on 1.2.1972 at Rs. 8000 and Plot No. 2,3,4,5 were purchased on 7.1.1970 at Rs. 3000 each. (Originaly Plot 4 was Purchased by her Father and 5 by her c.Brother. Plot No. 1 of S.No. 121(3-4) was purchased on 27.5.1985 at Rs. 9990.

[#] Note 3 : This Residential House was constructed during 1972-74 at the cost of Rs. 31,000 and further improvements were carried out from time to time subsequently in different phases

[$] Note 4 : During 1983 to 1990 Rs. 2,70,252 were paid to the society in instalments, over and above that, a Loan of Rs.1,00,000 was made available by the society.

@ Note 5 : Current market value is calculated on the basis of "Cost Inflation Index" provided by the latest Government of India Notification No. S.O.(E) 59/2010 (F No.142/11/2010- TPLI) dated 21.07.2010 is shown as : @Cmv

* Note 6 : Current market value based on approximate rates said to be quoted in the market is shown as : * Cmv

the Name of the Company :- 1. TCS (Rs. 8201) 2. L & T (Rs. 1400) 3. GAIL (Rs. 42000) 4. RIL (Rs. 23000) 5. Cr.Greaves (Rs. 10000) 6. HCC (Rs. 10900) 7. Ster.Ind (Rs. 10100) Total Face Value of the Shares is Rs. 1,05,501.00 & these shares are bought at the price of Rs. 46,40.312.74. After deducting the amount of Rs. 20 lacs (Refundable interest - free deposit as per agreement registered on 23.6.2010 at page 4947 of 2010 in book No.1 in the Joint - Sub Registar's office Mumbai City-2) the actual amount of Investment is Rs. 26,40,312.74. Market value of the shares may be as per the Bulletin of the NSE of a given day. सदरहू समभागांचे दर्शनी मुल्य रुपये १,०५,५०१ असून प्रत्यक्ष खरेदी मुल्य ४६,४०,३१२ रुपये आहे. यामधून २० लक्ष रुपये परवाना धारकाची जमाठेव वजा केल्यास प्रत्यक्ष गुंतवणूक ही २६,४०,३१३ रुपयाची होते.

**भाऊराव देशमुख यांच्या जंगम मालमत्तांचे निधी स्रोत**

८६. सन २००४ च्या मुळ निवेदनाच्या परिशिष्ट ८ मध्ये श्री. भाऊराव तुळशिरामजी देशमुख यांच्या खाती असलेल्या त्यावेळच्या गुंतवणूकी म्हणजे (१) त्या परिशिष्टाच्या परिच्छेद २ मध्ये असलेली **पोस्टाची ज्येष्ठ नागरिक बचत योजना** : या योजनेमध्ये गुंतविलेली रक्कम रुपये ३,५०,००० एवढी होती (२) त्या परिशिष्टाच्या परिच्छेद ३ मध्ये असलेली स्टेट बँकेतील **मुदती ठेव** रुपये १,५०,०००. कमी लाभदायकतेमुळे वरील दोनही गुंतवणूकीची पुनर्रचना करण्यात आली. (३) त्या परिशिष्टाच्या परिच्छेद ६ मध्ये असलेली समभागातील गुंतवणूक त्यावेळी रुपये २,३७,४६० रुपये इतकी होती. त्या गुंतवणूकीची पूनर्रचना करावी लागली. (४) करारनाम्यामुळे गेली पाच सहा वर्षे वापरात असलेली २० लक्ष रुपयाची बिनव्याजी जमाठेव (५) गेल्या सहा वर्षात दरमहिन्याला करारनाम्याप्रमाणे भाडे रुपाने मिळणारे करपात्र उत्पन्न. (६) हा सारा निधी दिर्घमुदती समभागात गुंतविल्यामुळे डिव्हिडंड रुपाने मिळणारे करमुक्त उत्पन्न (७) एक वर्षानंतर समभाग काढल्याने/काढल्यास होणारे दिर्घ मुदती भांडवली (LTCG) लाभाचे करमुक्त उत्पन्न. (८) सन १९९९ च्या दरम्यान सेवानिवृत्ती लाभाच्या पोटी उपलब्ध झालेली रक्कम परिशिष्ट ४ मध्ये नमुद केलेली आहे. १९९९ ची ही मुळ गुंतवणूक त्यावरील परताव्यासह. जंगम मालमत्तांचे स्वामित्व मुख्यत्वे या स्रोतावर आधारीत आहे.

**जंगम मालमत्तांचे विवरणपत्र**

८७. आम्हा उभयतांच्या नावे असलेल्या जंगम मालमत्तांचे तपशील **परिशिष्ट ११** मध्ये दिलेले आहेत. त्यांची एकूण संख्या १० आहे. या कामी वापरण्यात आलेल्या निधीचे स्रोत परिच्छेद ७६ व ८६ मध्ये तपशीलाने नमुद केलेले आहे.

**अनुशेष निर्मूलनाच्या कामातील संघटनेचा सहभाग**

८८. सन २००४ च्या मुळ निवेदनाच्या परिच्छेद ४६ मधील पुढील मजकूर मी जसाच्या तसा नमुद करु इच्छितो. :-

"१९९२ चा नुटा बुलेटीनचा "जलसिंचन अनुशेष विशेषांक" किंवा १९९६ चा "अनुशेष विशेषांक" किंवा १९९८ मध्ये संघटनेने प्रसिद्ध केलेले "महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष क्ष किरण परीक्षा" हे पुस्तक ही याची जिवंत उदाहरणे आहेत. एका व्यवसायातील व्यावसायिकांसाठी काम करणाऱ्या एखाद्या व्यावसायिक संघटनेने विभागाच्या सर्वांगाला चाटुन जाणाऱ्या व त्रस्त करणाऱ्या अनुशेष निर्मूलनाच्या कामामध्ये, त्यांत अंतर्भूत असलेल्या आर्थिक भारासह जबाबदारी स्वीकारुन, एवढे काम केल्याचे महाराष्ट्रात दुसऱ्या एखाद्या संघटनेचे उदाहरण असेल काय? अर्ध्या डझनाच्या जवळपास गावांसाठी पाणीपुरवठ्याचे विशेषांक काढण्यासाठी केलेल्या धावपळीतून समोर येणारा संघटनेचा सहभाग निश्चितच लक्षात घेण्यासारखा नाही काय?"

**विधानमंडळ सदस्य म्हणून मिळणारे वेतन अनुशेष निर्मूलनाच्या कामी संघटनेच्या सुपूर्त**

८९. आमच्या संघटनेने अनुशेषाच्या संदर्भात वैचारिक जाणिवा व जागृती निर्माण करण्याच्या कामी फार मोठे योगदान दिलेले आहे. सन १९९२ चा जलसिंचनाचा नुटा बुलेटीनचा विशेषांक पाहिला तर त्या कामी येणारा आर्थिक भार सहन करण्यासाठी संघटनेतील सहकाऱ्यांनी लहान मोठ्या जाहिराती गोळा करुन ते आर्थिक बळ उभे केले होते असे दिसून येते. पुढे पुढे हे काम वाढत गेल्यावर त्याच त्याच लोकांकडून त्याच त्याच लोकांनी जाहिराती गोळा करणे यातायातीचे वाटल्याने इच्छा असलेल्या प्रत्येक सदस्याने अल्पसा स्वेच्छाधीन आर्थिक सहभाग देऊन संघटनेच्या खाती विशेषांक निधी उभा करण्यात आला व त्यातूनच असा खर्च भागविला जातो. इतर सहकाऱ्यांबरोबरीचा अल्पसा सहभाग व्यक्तीशः त्या काळात देणे ही किमान अपेक्षा झाली, पण या कामाचे नेतृत्त्व करणारी व्यक्ती या नात्याने या कामासाठी संघटनेत भरघोस आर्थिक स्वेच्छाधिन सहभाग देण्याची इच्छा असून सुद्धा सन २००४ च्या पूर्वी मला ते शक्य झाले नाही. **अनुशेष निर्मूलनाच्या प्रयत्नात जाणिवा व जागृती निर्माणाचे जे काम आमची संघटना करीत आहे ते लक्षात घेता सन २००४ नंतरचे विधानमंडळ सदस्य या नात्याने मिळणारे सर्व वर्षांचे वेतन (Salary) संघटनेच्या सुपूर्त करण्याचा निर्णय घेतला व त्याची अम्मलबजावणी केली. ती पुढील प्रमाणे** :-

(१) विधानपरिषद सदस्यत्वाच्या पाचव्या कार्यकालापैकी सन २००५ या पहिल्या पुर्ण वर्षातील १२ महिन्यांसाठीचे विधानमंडळ सदस्य या नात्याने मिळालेले वेतन (Salary) संघटनेच्या सुपूर्त करण्याचा निर्णय कळविणारे प्रा.बी.टी.देशमुख यांचे दिनांक १६.०९.२००६ चे पत्र क्रमांक विपसवे/१०१ **सहपत्र : एक** म्हणून सोबत दिलेले आहे.

(२) विधानपरिषद सदस्यत्वाच्या पाचव्या कार्यकालापैकी सन २००६ या दुसऱ्या पुर्ण वर्षातील १२ महिन्यांसाठीचे विधानमंडळ सदस्य या नात्याने मिळालेले वेतन (Salary) संघटनेच्या सुपूर्त करण्याचा निर्णय कळविणारे प्रा.बी.टी.देशमुख यांचे दिनांक १४.०९.२००७ चे पत्र क्रमांक विपसवे/१०२ **सहपत्र : दोन** म्हणून सोबत दिलेले आहे.

(३) विधानपरिषद सदस्यत्वाच्या पाचव्या कार्यकालापैकी सन २००७ या तिसऱ्या पुर्ण वर्षातील १२ महिन्यांसाठीचे विधानमंडळ सदस्य या नात्याने मिळालेले वेतन (Salary) संघटनेच्या सुपूर्त करण्याचा निर्णय कळविणारे प्रा.बी.टी.देशमुख यांचे दिनांक १२.०५.२००८ चे पत्र क्रमांक विपसवे/१०३ **सहपत्र : तीन** म्हणून सोबत दिलेले आहे.

(४) विधानपरिषद सदस्यत्वाच्या पाचव्या कार्यकालापैकी सन २००८ या चौथ्या पुर्ण वर्षातील १२ महिन्यांसाठीचे विधानमंडळ सदस्य या नात्याने मिळालेले वेतन (Salary) कोणत्याही पत्राशिवाय रेखांकित धनादेशाव्दारे संघटनेच्या सुपूर्त केलेले आहे.

(५) विधानपरिषद सदस्यत्वाच्या पाचव्या कार्यकालापैकी सन २००९ या पाचव्या पुर्ण वर्षातील १२ महिन्यांसाठीचे विधानमंडळ सदस्य या नात्याने मिळालेले वेतन (Salary) कोणत्याही पत्राशिवाय रेखांकित धनादेशाव्दारे संघटनेच्या सुपूर्त केलेले आहे.

**असत्य आरोप करणारे 'सुसंस्कृत' उमेदवार : २००४**

**९०. दिनांक २२ नोव्हेंबर २००४ रोजी बुलढाणा येथे निवडणूक प्रचारानिमित्त घेतलेल्या एका पत्रकार परिषदेमध्ये अमरावती विद्यापीठात प्रा.बी.टी. देशमुख सात वर्षात ७४३ प्रकरणात चौकशी समितीचे अध्यक्ष किंवा सदस्य होतात**

*( सहपत्र : पाच )*

## *बाजारात सांगितल्या जाणाऱ्या भावावर आधारित विद्यमान मुल्य*

सन २००४ मध्ये केंद्र शासनाच्या २९.६.२००४ परिपत्रकाप्रमाणे विद्यमान मुल्य दाखविले होते. ते परिशिष्ट २ व १० मध्ये नमुद केले आहे. आज २०१० मध्ये २१.७.२०१० च्या केंद्र शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे ते दाखविले आहे. ते परिशिष्ट १० मध्ये दाखविले आहे. काहींच्या मते प्रत्यक्ष बाजारभावाप्रमाणे या किम्मती दाखविणे जास्त योग्य होय. त्यामुळे मी त्या दोनही पद्धतीने दाखविले आहे. तसे प्रतिज्ञापत्रात नमुद केले आहे. अर्थात बाजारभाव हे अंदाजे व ढोबळमानाने माहिती घेवून लावलेले आहेत. परिशिष्ट १ मध्ये दिलेल्या :- (१) मालमत्ता क्रमांक १ व ५ ची किम्मत अंदाजे ५०० रुपये फुट याप्रमाणे ४० लक्ष रुपये धरलेली आहे व मालमत्ता क्रमांक ९ ची किम्मत अंदाजे १०० रुपये फुटाप्रमाणे ३ लक्ष अशी एकूण ४३ लक्ष रुपये धरलेली आहे. (२) मालमत्ता क्रमांक २,३ व ४ ची किंम्मत अंदाजे ५०० रुपये फुट या प्रमाणे ४५ लक्ष रुपये धरलेली आहे. (३) मालमत्ता क्रमांक ६ व ७ ची किम्मत अंदाजे ३० लक्ष रुपये एकर याप्रमाणे २.०० कोटी रुपये धरलेली आहे. (४) मालमत्ता क्रमांक ८ ची किम्मत अंदाजे २५ लक्ष रुपये धरली आहे. (५) मालमत्ता क्रमांक १० ची किम्मत अंदाजे १.५ कोटी रुपये धरली आहे.

**आणि त्यातून त्यांनी लाखो रुपयांचा भत्ता मिळविला.** असा एक अत्यंत असत्य, बिलकुलच बिनबुडाचा व अत्यंत बेजबाबदारपणाचा वैयक्तिक चारित्र्यहनन करणारा आरोप सन २००४ च्या निवडणूकीमध्ये निवडणूक सुरु झाल्यावर एका 'सुसंस्कृत' उमेदवाराने केला होता. **या पत्रकार परिषदेचा वृत्तांत दिनांक २३ नोव्हेंबरच्या काही वृत्तपत्रात छापून आला होता.** प्रत्यक्षात जरी हा आरोप २३ नोव्हेंबरला छापून आलेला असला तरी त्यापूर्वी महिना दोन महिने अगोदर ते असा आरोप करीत होते. त्यामुळेच सन २००४ च्या मुळ निवेदनात परिच्छेद ५१.३ मध्ये पुढील मजकूर समाविष्ट करण्यात आला होता. :-

**"अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेपासून (१९८३) तर आजपर्यंतच्या काळात कोणताही प्रवास भत्ता किंवा दैनिक भत्ता अमरावती विद्यापीठाकडून मी घेतलेला नाही. याच काळात संघटनेकडून सुद्धा कोणताही दैनिक भत्ता व प्रवास भत्ता घेतलेला नाही."**

वस्तुतः ते नुटा बुलेटीन ८ नोव्हेंबर २००४ रोजी प्रकाशित झाले होते, बुलेटीन प्रकाशनाच्या स्थळी येवून बुलेटीन अवलोकनोत्तर लोकसत्ताचे प्रतिनिधी श्री. मोहन अटाळकर यांनी **"सर! तुम्ही हे वाक्य बुलेटीनमध्ये टाकले हे फारच योग्य झाले. काही लोक वेगवेगळा प्रचार करीत होते" असे मला सांगितले.** असे असतांनाहि २२ नोव्हेंबर २००४ रोजीच्या बुलढाण्याच्या पत्रकार परिषदेत त्या 'सुसंस्कृत' उमेदवाराने तो आरोप केला होता. "ज्याचा खरेखोटेपणा पडताळून पाहिलेला नाही असे आरोप ठेवून किंवा त्यास विकृत स्वरूप देउन इतर पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर टीका करण्यात येउ नये." असे आचार सहितेचे बंधन असतांना त्यांनी असा आरोप केला होता व त्यामुळेच अनेक वृत्तपत्रांनी त्या असत्य मजकूराकडे दुर्लक्ष केले होते. माझे व्यक्तीशः असे मत आहे की निवडणूकीमध्ये उमेदवाराच्या सार्वजनिक प्रश्नावरील भूमिकांची चर्चा होणे त्यावर टिका प्रतिटिका होणे स्वागतार्ह असते. मात्र एकदा निवडणूक सुरु झाल्यानंतर वैयक्तिक चारित्र्यहनननाने आरोप कोणी करत असेल तर तो विषय लोकांच्या न्यायबुद्धीवर सोडणेच योग्य असते. **मतदार हे न्यायाधीश असतात. त्यांच्यासमोर आपली कैफियत सुसंस्कृतपणे आणि सभ्यतेने मांडली पाहिजे. पत्रपरिषदांच्या माध्यमातून द्रव पदार्थात बुडवून वापरली गेलेली अभद्र भाषा, अपशब्दांचा वापर, उद्धट आणि उर्मटपणाचे बोलणे, वारंवार तेच तेच असत्य आरोप करणे या सर्व बाबींचे लोक उत्तम मूल्यमापन करतात.** मी ठरलेल्या धोरणाप्रमाणे संपूर्ण निवडणुकीच्या काळात एका शब्दाने त्या आरोपाला उत्तर दिले नाही. मात्र निवडणूक ओटोपल्यानंतर त्या आरोपातील लबाडी लोकांसमोर मांडली. वृत्तपत्रासमोर मांडली. (सन २००५ चे नुटा बुलेटीन पृष्ठ ५ व १७ पहा)

**असत्य आरोप करणारे 'सुसंस्कृत' उमेदवार : २०१०**

९१. १९९९ पूर्वीच माझ्या कौटूंबिक जबाबदाऱ्या पूर्णपणे संपलेल्या होत्या. उपजिविका व प्रपंच या नावाचा खर्च जसा इतरांना असतो तसा तो मलाही होता, अन् आहे व त्यासाठी सेवानिवृत्ती वेतन इतरांप्रमाणे मलाही पूरेसे आहे. **मात्र गेल्या सहा वर्षातील एका घटनेत २ ते ३ लाख रुपये वैद्यकिय उपचारावर खर्च करावे लागले. कायद्यातील तरतुदीप्रमाणे हा खर्च व्यक्तीशः मला सहन करावा लागला नाही.** परवा 'नुटा'च्या कार्यकारी मंडळातील माझे एक सहकारी सदस्य श्री. सुशिल काळमेघ यांनी मला असे सांगितले की २०१० च्या निवडणूकीतील एक 'सुसंस्कृत' उमेदवार त्यांच्याकडे "बी.टीं.ना २००६ मध्ये कशासाठी भरती केले होते. अँजिओग्राफी झाली होती की अँजिओप्लास्टी झाली, एकदा झाली की दोनदा झाली, किती खर्च आला? अशी चौकशी करीत होते. त्यावर ते काहीतरी 'स्टोरी' करणार आहेत."

सिंचन प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्याची १९७४ ची व्यवस्था बदलवून टाकणारे एका मागून एक चार शासननिर्णय त्यावेळी वित्त विभागाने काढले होते. विदर्भाला देण्यात आलेली ही अत्यंत कौर्यपूर्ण वागणूक होती. "एवढा विदर्भद्वेष्टा अर्थमंत्री होणे नाही" या मथळ्याचे १ डिसेंबर २००६ या तारखेचे एक नुटाबुलेटीन ८-१० दिवस अहोरात्र मेहनत करुन, मी व माझ्या सहकाऱ्यांनी एका भरगच्च पत्रकार परिषदेत प्रकाशित केले होते. पत्रकारांनी त्या प्रकरणांतील अन्यायाला मोठी वाचा फोडली होती. "पाटबंधारे प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्याची १९७४ पासून अस्तित्वात असलेली व्यवस्था बदलवून टाकणारा २९ नोव्हेंबर २००५ चा शासननिर्णय, त्यात दुरुस्ती करणारा २८.०७.२००६ चा, १८.०९.२००६ चा व १३ नोव्हेंबर २००६ चा निर्णय या चार शासन निर्णयांची अनौरस पिलावळ विदर्भाचा छळ करणारी आहे ती आपण रद्द करणार की नाही?" अशी मागणी मी विधानपरिषदेत आपल्या ७ डिसेंबर २००६ रोजीच्या एका तासाच्या भाषणात केली होती. पुढे वित्त विभागाला १३ मार्च २००७ रोजी एक शासननिर्णय काढून हे चारही शासननिर्णय रद्द करावे लागले. **ही उपलब्धी अत्यंत देखणी होती पण त्यासाठीची ती झुंज मात्र माझ्यासाठी जीवघेणी ठरली होती.** सिंचनाच्या या प्रश्नावर सभागृहात संघर्ष करीत असतांना उपरोक्त भाषणाच्या वेळी मनाची आक्रमकता शरीराला सहन न झाल्यामुळे त्याच दिवशी म्हणजे ७ डिसेंबर २००६ रोजी मला उपचारार्थ भरती व्हावे लागले होते. कोणी अपप्रचारासाठी या घटनेचा काही वापर करीत असतील, कोण्या एखाद्या 'सुसंस्कृत' उमेदवाराला हा 'स्टोरी' करण्याचा विषय वाटत असेल, तर अशा 'स्टोरी'वाल्यांचे ईश्वर भले करो एवढेच मी म्हणेन. पण निवडणूक सुरु होण्यापूर्वीच असा आरोप केला जात असल्याचे अन्य मार्गाने सुद्धा मला कळल्यामुळे याबाबतची वस्तुस्थिती मी मांडत आहे, ती पुढील प्रमाणे :-

(१) विधानमंडळ सदस्याने घेतलेल्या वैद्यकीय उपचारावर झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती कोषागारामार्फत मिळण्याची कायदेशीर तरतुद आहे.

(२) **विधानमंडळ सदस्य या नात्याने सन १९८० पासून तर २००५ पर्यंतच्या २५ वर्षाच्या काळात एक रुपयाची सुद्धा वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती कोषागारातून घेतलेली नाही.** तशी गरज पडली नाही हे मुख्य कारण.

(३) **सन २००६ मध्ये उपचारार्थ झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती व्यक्तीशः मिळू शकत असतांना माझ्याच विनंतीवरुन कोषागारातून थेट वोक्हार्ट हॉस्पीटलला रेखांकित धनादेशाद्वारे अदा करण्यात आली होती.**

"लोकप्रतिनिधी हे लोकांचे प्रतिनिधी असल्याने त्या नात्याने त्यांना मिळणाऱ्या सुविधा जाणून घेण्याचा लोकांना अधिकार आहे. अशी माझी धारणा आहे." हे माझे मत, सन २००७ मध्येच माहितीच्या अधिकारामध्ये सर्व विधानमंडळ सदस्यांबाबतची माहिती एका माजी विधानमंडळ सदस्याने मागीतली होती, त्यावेळी मी लेखी कळविले होते. त्यासाठी कायद्यातील तरतुदीनुसार माझी सम्मती आवश्यक आहे. असे कोषागार अधिकाऱ्यांनी मला कळविले होते. दिनांक २६ मार्च २००७ रोजी पत्र पाठवून मी तशी लेखी सम्मती कळविली होती. ते पत्रच मी आज **सहपत्र** ४ म्हणून सोबत प्रकाशित करीत आहे. अपप्रचार करणाऱ्यांच्या साऱ्या कुशंकाची उत्तरे त्या पत्रात सापडतील.

**जंगम मालमत्तांची संपादनूक व आयकर विवरणे**

९२. सन २००४ च्या मुळ निवेदनाच्या परिच्छेद ५१.१ मधील पुढील मजकूर मी जसाच्या तसा नमुद करु इच्छितो :-

"आपल्या करदायित्वाची बारीक सारीक माहीती करुन घेणे, वर्षभरातील आपल्या करपात्र उत्पन्नाच्या बिनचूक नोंदी ठेवणे, कायद्याने मिळू शकणाऱ्या करवजावटीसाठी ताण सहन करुनसुद्धा बचतीचे वा गुंतवणूकीचे नियोजन करणे व याउपरान्त पडेल तो कर वेळच्या वेळी भरणे हा माझ्याकरीता अतिशय समाधान व आत्मविश्वास प्रदान करणारा एक नियमित वार्षिक विधी ठरला."

आम्हा उभयतांच्या नावे सन २०१० मध्ये असलेल्या जंगम मालमत्तांच्या संपादनामध्ये वापरण्यात आलेल्या निधीचे स्रोत अनुक्रमे परिच्छेद ७६ व ८६ मध्ये नमुद केलेले आहे. अशा मालमत्तांचे तपशील परिशिष्ट ११ मध्ये नमुद केलेले आहेत. सन २००५ नंतरच्या काळात मी आयकराच्या वरच्या दराने कर भरणाऱ्या करदात्यांच्या वर्गवारीत वर्ग झालो होतो. श्रीमती देशमुखांना सुद्धा पॅनकार्ड धारण करणे व दरवर्षी आयकर विवरणपत्रे भरणे अपरिहार्य झाले होते. आम्हा उभयतांच्या **गेल्या ५-६ वर्षातील आयकर विवरण पत्राचा**

***अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेपासून (१९८३) तर आजपर्यंतच्या काळात कोणताही प्रवास भत्ता किंवा दैनिक भत्ता अमरावती विद्यापीठाकडून मी घेतलेला नाही. याच काळात संघटनेकडून सुद्धा कोणताही दैनिक भत्ता व प्रवास भत्ता घेतलेला नाही.***

(परिच्छेद ९० पहा)

**भाग असलेल्या करपात्र व करमुक्त उत्पन्नात जंगम मालमत्तांच्या स्वामित्त्वाचे स्त्रोत समाविष्ट आहेत. हे मी नमूद करीत आहे.**

**परिशिष्टांचे तपशिल**

९३. सन २००४ च्या मुळ निवेदनासोबत एकूण ९ परिशिष्ट्ये जोडली होती. त्यातील क्रमांक एक, दोन व चारचे परिशिष्ट आजही उपयुक्त असल्याने ती परिशिष्ट्ये जशीच्या तशी आता पून्हा वापरली आहेत. परिशिष्ट ३ मध्ये "खरेदी केलेल्या पण नंतर विकलेल्या स्थावर मालमत्तांचे तपशील" नमुद होते. आजच्या प्रतिपादनाशी त्याचा संबंध नसल्यामुळे ते पून्हा वापरलेले नाही. सेवानिवृत्ती लाभांच्या खात्यातून काही रक्कम कर्जफेड व परतफेडीसाठी वापरली होती, ती पाचव्या परिशिष्टामध्ये दाखविली होती. सन २००५ नंतर ती रक्कम सेवानिवृत्ती लाभांच्या खात्याकडे पुन्हा वळती करण्यात आल्याने ५ व्या परिशिष्टाचा वापर केलेला नाही. तसेच २००४ च्या मुळ निवेदनातील परिशिष्ट ३ व ५ च्या सोबतच ६,७,८ व ९ ही परिशिष्टे आजच्या प्रतिपादनाशी संबधीत नसल्याने त्यांचा वापर केलेला नाही. परिशिष्ट १०, ११ व १२ ही नवी परिशिष्टे आज सोबत जोडली असून ती स्वयंस्पष्ट आहेत. परिशिष्ट १० च्या स्तंभ २ मध्ये मालमत्ता संपादनाचा कालखंड/दिनांक दर्शविला असून स्तंभ तीनमध्ये मुळ खरेदी किम्मत दर्शविलेली आहे. स्तंभ चार मध्ये सन २००४ चे विद्यमान मुल्य व स्तंभ पाचमध्ये २०१० चे विद्यमान मुल्य दर्शविले आहे. परिशिष्ट ११ मध्ये "जंगम मालमत्तांचे विवरणपत्र - सन २०१०" नमुद केलेले आहे. तर परिशिष्ट १२ मध्ये प्रतिज्ञापत्र समाविष्ट आहे.

**उमेदवारी अर्जासोबतचे प्रतिज्ञापत्र**

९४. उमेदवारी अर्जासोबत सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र (Affidavit to be furnished by candidate alongwith nomination paper Before the Returning Officer for election to Maharashtra Legislative Council from Amravati Division Graduates Constituency) सोबत **परिशिष्ट १२** मध्ये दिलेले आहे. उमेदवारी अर्जासोबत दाखल केलेले प्रतिज्ञापत्र येथे जसेच्या तसे शब्दशः उद्धृत केलेले आहे. फरक एवढाच आहे की, तेथे सादर करतांना तक्ता पद्धतीने ठरवून दिलेल्या नमुन्यात सादर केलेले आहे व येथे ते धावत्या मजकुराच्या स्वरुपात मुद्रीत केलेले आहे.

**जनाधार व धनाधार**

९५. "निवडणूकीसाठी थोडे फार धन खर्च होतेच ही गोष्ट खरी आहे. पण उमेदवाराने व त्याच्या पाठीराख्यांनी याची काळजी घेतल्यास तो खर्च किमान मर्यादेपर्यंत ठेवता येणे कठीण नसते. शिवाय पाठीराख्यांनी आपल्या 'उत्तम व्यवहारातून' जिव्हाळ्याने या कामी दिलेले १० रुपये सुद्धा १० हजार रुपयाचे काम करुन जातात. याठिकाणी कामी आलेला किंवा येणारा अल्पसा धनाधार हा सुद्धा त्या व्यापक जनाधाराचा अविभाज्य भाग असतो. याच्या उलट उमेदवाराने किंवा त्यांच्या पाठीराख्यांनी 'उद्दाम व्यवहारातून' मिळविलेले व या कामी ओतलेले १० हजार रुपये हे १० रुपयाचेसुद्धा काम करू शकत नाहीत. पदवीधर मतदार संघामध्ये नोंदणीसाठीचे फॉर्म भरून आणण्याचेसुद्धा दरपत्रक उमेदवाराने ठरवून दिले असेल तर त्या दरानुसार कार्यरत असलेले मोजके लोक हा जनसमुहच असतो हे खरे असले तरी यातून समोर येणारा हा जनाधार बेमालूमपणे धनाधाराचाच अपरिहार्य भाग झालेला असतो. अशा या धनाधाराच्या आधारे निवडून गेलेल्या प्रतिनिधीला स्वाभाविकपणे त्या आधाराचीच पुजा बांधावी लागते व अशा त्या पुजाव्यवहारातून प्रतिनिधीने वापरावयाच्या सांसदीय आयुधांची धार कमालीची बोथट होते. ज्यांच्या आयुधांची धार कोणत्याही कारणाने बोथट झालेली आहे त्या लोकप्रतिनिधींनी शासनाला धारेवर धरण्याची कल्पना मग नुसत्या कल्पना विलासाचा भाग होऊन बसते. अशावेळी 'लोकांची भलाई हीच आपली कमाई' हा लोकशाहीला प्राणभूत असलेला मंत्र उलटा करुन वापरायला केंव्हा पासून सुरुवात झाली हे लक्षातसुद्धा येत नाही.शासनाला धारेवर धरण्याचा उपचार उघडपणे व जाहीररीत्या सभागृहात पार पाडावयाचा विधिमय व्यवहार असतो. अशा व्यवहाराचे अधिष्ठान हे वापरावयाच्या सांसदीय आयुधांच्या धारदारपणावर बांधलेले असते. अल्पसा धनाधार ज्याचा अविभाज्य भाग आहे असा व्यापक जनाधार ही या धारदारपणाची जननी असते, त्या जनाधाराचे मोजमाप करण्याची निवडणूक ही अधिकृत संधी असते.वेगळ्या शब्दात सांगायचे झाल्यास अशा जनाधाराच्या मोजमापात आपल्याला किती गुण मिळतात? या गुणदान मोजमापाची निवडणूक ही एक परीक्षा असते."

**दुर्मिळ असे वैभव**

९६. सन २०१० च्या निवडणूकीला सामोरे जातांना नुटाच्या कार्यकारी मंडळाने घेतलेला निर्णय सन २०१० च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ९६ वर प्रसृत केलेला आहे. त्यातील परिच्छेद ३ मी जसाच्या तसा नमुद करु इच्छितो. :-

"१९८०, १९८६, १९९२, १९९८ व २००४ या पाचही निवडणुकीमध्ये सर्व केंद्रीय व्यवस्था आपली आपण सांभाळली होती व शिवाय आपल्या शहरात, आपल्या गावात आपल्या मतदान केंद्रावरील व्यवस्था सुद्धा आपली आपणच केली होती, तशीच ती आपण याही वेळेला पार पाडू. काळ बराच बदललेला आहे. बाहेर इतर कोणाला हे सांगितले तरी खरे वाटत नाही, असा आजचा काळ. या काळातही हे आपले "वैभव" आपण पूर्ण शक्तीनिशी कायम ठेवू."

याबाबतच्या निर्णयाच्या अम्मलबजावणीला अतिशय उत्तम प्रतिसाद मिळालेला आहे, मिळत आहे. यापूर्वीच्या पाचही निवडणूकीमध्ये संघटनेने, शिक्षकांनी, मतदारांनी, पदवीधरांनी व हितचिंतकांनी जे आर्थिक पाठबळ त्या पाचही वेळी उभे केले त्यामुळेच ते यश त्या त्या वेळी पदरी पडले होते हे निःसंशय होय. शिवाय या "दुर्मिळ वैभवाचे" आपण प्रतिनिधी आहोत याचा ठसा प्रतिनिधीच्या कामकाजावर व मनोधैर्यावर हमखासपणे उमटत असतो. हे वैभव हे केवढे मोठे धन असते याची कल्पना फक्त त्या वैभवाच्या लाभधारकांनाच कळू शकते. आजच्या बदललेल्या काळात सुद्धा आपण आपले हे वैभव टिकवून आहोत हा आपणा सर्वांसाठीच आनंदाचा विषय आहे.

**प्रतिज्ञापत्राचे प्रकाशन**

९७. "विधीमंडळ हे लोकशाहीचे महामंदीर आहे. जनता जनार्दन हीच त्याची स्वयंभू सार्वभौम देवता! प्रतिनिधी हे त्या देवतेचे उपासक आहेत" ज्येष्ठ विचारवंत श्री. बाळासाहेब भारदे यांनी मांडलेला हा विचार लोकशाहीचा पायाभूत विचार आहे. जन हेच जनार्दन आहेत, या श्रद्धेने लोकशाही पंढरीच्या वारिला निघालेले लोकप्रतिनिधी (उमेदवार) हे वारकरी आहेत, त्या वारकऱ्यांच्या श्रेष्ठींनी आम्हाला हेहि सांगितले आहे की "परमार्थाचा विवेक" करण्यापूर्वी "आधि प्रपंच नेटका करा" सार्वजनिक जीवनामध्ये काम करणाऱ्या प्रत्येकाच्या जीवनाला 'प्रपंच' किंवा 'संसार' या नावाची एक लहानशी बाजू असतेच. ती नेटकी ठेवण्यामुळे त्याच्या सार्वजनिक जीवनाच्या संसाराचे सौंदर्य वृद्धींगत होते. या भावनेने सन २००४ चे मुळ निवेदन लहानमोठ्या बारकाव्यासह मी त्यावेळी प्रकाशित केले होते व त्याच भावनेने सन २००४ ते २०१० या काळातील सर्व तपशील जाहिरपणे मांडतांना मला मनापासून आनंद होत आहे.

दिनांक ०६.११.२०१०

**- बी.टी.देशमुख,**
विधानपरिषद सदस्य

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Dr.A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. Dhote D.S., 4C, 'Rajdatta', Mahalaxmi Colony, Near Shankar Nagar, Amravati-444 606. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/ 2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/78/ 2009-11 WPP Registration No. NR/ATI/WPP-01/ 2009-11 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting :**12.11.2010**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

---------------------------------------------------

To,.......................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................